सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, ७ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १३७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## शेख हसीना पुढील ४८ तासांत सोडणार भारत! अमेरिकेने रद्द केला व्हिसा



नवी दिल्ली: बांगलादेशमधील हिंसाचारानंतर आपला देश सोडून भारतात आलेल्या माजी पंतप्रधान शेख हसीना पुढील ४८ तासांत युरोपला जाऊ शकतात. दरम्यान, युरोपातील कोणत्या देशात जाणार याबाबतची माहिती समोर आलेली नाह. याआधी त्या लंडनमध्ये जाणार असे बोलले जात होते. मात्र ब्रिटनने त्यांना देशात येण्याची परवानगी दिली नाही तर अमेरिकेने त्यांचा व्हिसाही रद्द केला आहे.

दरम्यान, त्या सध्या उत्तर प्रदेशातील गाझियाबाद स्थित हिंडन एअरबेसच्या एका सेफ हाऊसमध्ये आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार शेख हसीना युरोपातील कोणत्याही देशात जाऊ शतात. सोबतच इतर देशांशीही चर्चा सुरू आहेत. चर्चा अशीही होत आहे की त्या रशियालाही शरण जाऊ शकतात.

यासोबतच हे ही म्हटले जात आहे की शेख हसीना यांना भारत पूर्णपणे सुरक्षा देईल आणि त्यांच्या जाण्याची व्यवस्थाही करेल. यामागचे कारण आहे की जे विमान शेख हसीना यांना भारतात सोडण्यास आले होते ते बांगलादेशच्या वायुसेनेचे होते आणि ते परतले आहे. अशातच आता त्या ज्या देशात जातील त्यांच्या जाण्याची व्यवस्था भारत करेल.

फिनलँड की रशिया? कुठे जाणार शेख हसीना

शेख हसीना यांच्या सुरक्षित बाहेर पडण्याची सर्व व्यवस्था करण्यात आली आहे. सोमवारी संध्याकाळी भारतात पोहोचलेल्या हसीना फिनलँड आणि रशिया यांसारख्या देशांशी चर्चा करत आहेत.भारत त्यांच्या पुढील परदेशी प्रवासासाठी त्यांच्या सुरक्षेचीही व्यवस्था करेल.

## राष्ट्रपती मुर्मूंना फिजीचा सर्वोच्च नागरी पुरस्कार

सुवा, ०६ ऑगस्ट : भारतीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज, मंगळवारपासून फिजी, न्यूझीलंड आणि तिमोर-लेस्टेच्या दौऱ्यावर आहेत. राष्ट्रपती मुर्मू यांनी फिजीच्या कम्पॅनियन ऑफ द ऑर्डर ऑफ फिजी या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रपती मुर्मू आज, मंगळवारी सकाळी नाडी इथून फिजीची राजधानी सुवा येथे पोहोचल्या. फिजीचे पंतप्रधान सितिवेनी राबुका यांनी विमानतळावर त्यांचे पारंपारिक पद्धतीने स्वागत केले. फिजीच्या पंतप्रधानांच्या उपस्थितीत राष्ट्रपती मुर्मू यांच्यासाठी पारंपरिक स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर, राष्ट्रपतींनी फिजीच्या स्टेट हाऊस ला भेट दिली जिथे फिजीचे राष्ट्रपती रातु विलियम मैवालिली काटोनिवेरे यांनी त्यांचे स्वागत केले. भारत-फिजी संबंध अधिक दृढ करण्याच्या मार्गांवर उभय नेत्यांनी चर्चा केली. स्टेट हाऊस मध्ये फिजीच्या राष्ट्राध्यक्षांनी कम्पॅनियन ऑफ द ऑर्डर ऑफ फिजीहा फिजीचा सर्वोच्च नागरी पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना प्रदान केला. यावेळी राष्ट्रपतींनी फिजीच्या संसदेला संबोधित केले. दोन्ही देशांच्या आकारमानात मोठा फरक



असूनही,भारत आणि फिजी या दोन्ही देशांत आपल्या महत्वपूर्ण लोकशाहीसह बरेच साम्य असून लोकशाहीला प्रोत्साहन देण्यासाठी समृद्ध अनुभव असलेला जवळचा मित्र आणि भागीदार या नात्याने भारत सदैव फिजी समवेत भागीदारीसाठी तयार असल्याचे त्यांनी सांगितले. ग्लोबल साउथचा एक शक्तिशाली आवाज म्हणून, भारत हवामान न्यायासाठी फिजी आणि इतर महासागरातील देशांच्या खांद्याला खांदा लावून उभा राहील असे राष्ट्रपतींनी सांगितले.

त्यानंतरच्या कार्यक्रमात फिजीचे पंतप्रधान सितिवेनी राबुका यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. उभय नेत्यांनी व्यापक विचारविनिमय केली आणि ऐतिहासिक संबंध वाढवण्यावर आणि दोन्ही देशांमधील भागीदारी मजबूत करण्यावर सहमती दर्शवली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान सितिवेनी राबुका यांनी (ळ) भारतीय उच्चायुक्तालय आणि भारतीय सांस्कृतिक केंद्र संकुल, सुवा आणि (ळळ) सुवा येथील १०० खाटांचे सुपर स्पेशालिटी रुग्णालय, यासाठी प्रकल्प स्थळांच्या निवडीबाबतची कागदपत्रे सुपूर्द करण्याच्या समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवले. राष्ट्रपतींनी भारतीय समुदायाच्या उत्साही मेळाव्यालाही संबोधित केले. आमच्या स्वप्नातील भारत घडवण्याच्या प्रवासात आम्ही जगभरातील आमच्या परदेशी भारतीय समुदायाला महत्त्वाचे भागीदार आणि हितधारक म्हणून पाहतो असे राष्ट्रपतींनी नमूद केले. राष्ट्रपतींनी सुवा येथील राष्ट्रीय युद्ध स्मारकालाही भेट दिली आणि शहीद सैनिकांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले. त्यांनी महात्मा गांधी मेमोरियल हायस्कूललाही भेट दिली आणि तिथे महात्मा गांधींच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला.सुवा येथील अधिकृत कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर राष्ट्रपती नाडीला रवाना झाल्या तेथून त्या उद्या न्यूझीलंड मधील ऑकलंड येथे विमानाने रवाना होतील.

## लालकृष्ण अडवाणी यांची प्रकृती खालावली, रुग्णालयात केलं दाखल



मुंबई : भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना आज सकाळी दिल्लीतील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपोलो हॉस्पिटलच्या न्यूरोलॉजी विभागात त्यांना दाखल करण्यात आलंय. रुग्णालयाने सांगितले की, त्यांची प्रकृती स्थिर असून डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर लक्ष ठेवून आहेत. ९६ वर्षीय अडवाणी यांना वया अधिक झाल्याने आरोग्याच्या समस्या आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना दिल्लीतील एम्समध्ये दाखल करण्यात आले होते.

अडवाणी यांना यावर्षीचा देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार भारतरत्न प्रदान करण्यात आलाय. प्रकृतीच्या कारणाने ते राष्ट्रपती भवनात उपस्थित राहू शकले नव्हते, त्यामुळे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ३० मार्च रोजी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना भारतरत्न देऊन सन्मानित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपराष्ट्रपती जगदीप धनखर, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा आणि लालकृष्ण अडवाणी यांचे कुटुंबीय या औपचारिक सोहळ्याला उपस्थित होते.

२०१५ मध्ये अडवाणी यांना देशाचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मविभूषणने सन्मानित करण्यात आले होते. लालकृष्ण अडवाणी हे २००२ ते २००४ पर्यंत भारताचे ७ वे उपपंतप्रधान होते. ते भारतीय जनता पक्षाच्या सह-संस्थापकांपैकी एक आहेत आणि राष्ट्रीय स्वयंसेवकाचे सदस्य आहेत. लालकृष्ण अडवाणी हे १९९८ ते २००४ या काळात सर्वाधिक काळ गृहमंत्री राहिले.

## लद्दाख : भारताने सिंधू नदीवर केली पुलाची निर्मीती

लेह, ०६ ऑगस्ट : 'एलओसी'वर चीनच्या कुरापतीनंतर आता भारतानेही या भागात आक्रमक हालचाली सुरू केल्या आहेत. भारतीय लष्करामधील स्नो लेपर्ड ब्रिगेडच्या न्योमा सॅपर्सने पूर्व लडाखमधील पायाभूत सुविधांच्यादृष्टीने सिंधू नदीवर एक भक्कम ह्युम पाइप पुलाचे बांधकाम केले आहे. या पुलामुळे या भागातील दळणवळण सुलभ होणार आहे. तसेच लष्कर आणि सामान्य नागरिकांना न्योमा आणि निडर या गावांपर्यंत सहजपणे पोहोचता येणार आहे.



भारतीय लष्कराच्या फायर अँड फ्युरी कॉर्प्सने मंगळवारी एक्सवर एक व्हिडीओ शेअर करून याबाबतची माहिती दिली.

हा व्हिडीओ आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये पूर्व लडाखमधील न्योमा आणि निडर परिसरातील गावांदरम्यान नागरिक आणि लष्कराची ये जा सोपी व्हावी यासाठी बांधण्यात आलेल्या पुलाच्या बांधकामाची पूर्ण प्रक्रिया दाखवण्यात आली आहे. एकूण १ मिनिट ७ सेकंदांच्या या व्हिडीओमध्ये पूल बनवण्याच्या पूर्ण प्रकियेबरोबर लष्कराची काही अवजड वाहने देखील या पुलावरून जाताना दिसत आहेत. या माध्यमातून हा पुल किती भक्कम आहे हे दाखवण्याचा प्रयत्न लष्कराने केला आहे. हे पूल बांधण्यासाठी लष्कराच्या इंजिनियर्सनी ह्यूम पाइपचा वापर केला आहे. त्यानंतर त्यावर मजबूत बांधकाम केलं आहे. तसेच या पुलाचे काम कमीत कमी वेळात झाल्याचे सांगण्यात येत आहे.यापूर्वी ३० जुलै रोजी लडाखमधील भारत आणि चीन यांच्यादरम्यान असलेल्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ चीनने ४०० मीटर लांब पुलाचे बांधकाम केल्याची माहिती पुढे आली होती. मात्र हा पुल चीनने १९५८ मध्ये बळकावलेल्या भागात बांधण्यात आला होता.

## जिवाचे मैत्र कायम जपणे म्हणजे संघकार्य : डॉ. मोहन भागवत

अकोला, ६ ऑगस्ट - सर्व जग आज चिंतेत आहे, दहशतवादाची भीती आहे अशा वातावरणात ज्ञानेश्वर माऊलींनी सांगितल्याप्रमाणे सर्व जिवांचे मैत्र कायम जपणे हा संघाचा सिद्धांत मूर्त रूपाने प्रकट झाला आहे व तेच आपले ध्येय आहे.परस्परांशी असलेले ऋणानुबंध जपून आपणाला हा चमत्कार सर्वत्र करायचा आहे असे रा.स्व.संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले. मंगळवार, ६ ऑगस्ट रोजी येथील उत्सव मंगल कार्यालयात आयोजित संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक यशवंत उपाख्य श्याम देशपांडे यांच्या अभीष्टचिंतन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.



स्वयंसेवक संघाचे काम करीत असताना आपलेपणा जगत असतो.संघकार्य करताना त्याला अनेक ठिकाणी आपलेपणाचा जो अनुभव येतो त्याचा त्याला आनंद मिळतो.सर्वांच्या सान्निध्यातून आनंद होणे हेच संघाचे खरे स्वरूप आहे.आपण जेथे आहोत तेथे आपलेपणा, जिव्हाळा निर्माण व्हावा असे वातावरण असावे असेही ते म्हणाले. संघाचा आत्मा स्वयंसेवकच आहे. हिंदू धर्म, संस्कृती रक्षण आणि संवर्धनासाठी स्वयंसेवक कार्यरत असतो. काम करीत असताना अनेक बाबी त्याला शिकायला मिळतात. सोबतच अनेक ठिकाणी त्याचा आपलेपणाच्या भावातून ऋणानुबंध जुळतो हा भाव आणि जुळलेला ऋणानुबंध हीच संघशक्ती आहे. असे यावेळी ते म्हणाले. संघ समजून घ्यायचा असेल तर सर्वजण आपले आहेत हा भाव महत्त्वाचा आहे. काहींमध्ये क्वचित दोषही असतील तरी त्याला आपलेपणाच्या भावाने जपले पाहिजे. अनेकजण संघात गेल्यास काय मिळते, असा प्रश्न करतात. संघात गेल्यास काही मिळत नाही. मिळतो तो आपलेपणा. पण याचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय कुणाचा विश्वास बसणार नाही. हा पवित्र भाव आहे. तो संघाच्या कार्यपद्धतीत सहज वृद्धींगत होतो, असेही यावेळी बोलताना मोहनजी भागवत म्हणाले.

संघाचे काम करताना अनेक मित्र जोडल्या गेले. त्यांच्यामुळे कठिण काळात संघकाम करता आले. तर आयुष्य जगण्यातही आनंद मिळाला. माझे जीवन घडण्यात संघाचा मोठा वाटा असल्याचे सत्कारमूर्ती श्याम देशपांडे यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाला व्यासपीठावर डॉ. मोहन भागवत, सत्कारमूर्ती श्याम देशपांडे उपस्थित होते. कार्यक्रमात आदर्श गोसेवा प्रकल्प आणि डॉ. हेडगेवार रक्त केंद्राला धनादेश देण्यात आला.

## श्री.घृष्णेश्वराचे घेतले भाविकांनी उत्साहात दर्शन पहिल्या सोमवारी भाविकांची अलोट गर्दी



खुलताबाद प्रतिनिधी : वेरूळ येथील प्रसिद्ध बारावी ज्योतिर्लिंग असलेले श्रीघृष्णेश्वराच्या दर्शनासाठी श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारी हर हर महादेवाच्या जयघोषात पहाटेपासून दर्शन घेतले. सोमवारी दिवसभर भाविकांची मांदियाळी मंदिर परिसरात होती

शहरातून, खेड्यापाड्यातून आणि परराज्यातून भाविक दर्शनासाठी आले होते. बॅरिकेट्स आणि येण्या- जाण्यासाठी वेगवेगळ्या मार्ग चालू केल्यामुळे भाविकांना सुलभतेने दर्शन घेता आले. मंदिर परिसरातील आवारात भाविकांसाठी दानशूर भाविकांनी फराळ पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सीसीटीव्ही कॅमेरे, खाजगी सुरक्षा रक्षकांसह तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी ग्रामस्थांना पहाटे चार ते सात वाजेपर्यंत दर्शनासाठी दक्षिण द्वार खूले केले होते. (विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सोमवारी सकाळी श्री घृष्णेश्वर महादेवाचे दर्शन घेऊन मनोभावे पूजा केली.)

## रिद्धपूर येथील मराठी विद्यापीठाच्या कामाला गती द्यावी - चंद्रकांत पाटील

मुंबई, ६ ऑगस्ट - अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथील मराठी विद्यापीठाच्या कामाचे कालबद्ध नियोजन करून या कामाला अधिक प्राधान्य देऊन गती द्यावी, अशा सूचना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या. आज मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मराठी विद्यापीठ सद्यस्थिती संदर्भात सादरीकरण करण्यात आले. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधानसचिव विकासचंद्र रस्तोगी, उपसचिव अशोक मांडे, उपसचिव प्रताप लुबाळ,सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## खदानीमध्ये बुडून चार विद्यार्थ्यांचा मृत्यू; झरीची खदान बनली जीवघेणी

सोनखेड- परिसरातील झरी येथील खदाणीमध्ये पोहण्यासाठी गेलेल्या चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना आज दि. ६ ऑगस्ट रोजी घडली.

सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील झरी येथे अंदाजे वीस ते पंचवीस एकरवर गायरान जमीन आहे. येथील खडक उपसल्याने मोठी खदान निर्माण झाली असून त्यात पंचवीस फुटाच्या वर पाणी आहे. त्याच खदानवर विद्यार्थी फोटो, सेल्फी काढण्यासाठी येत असतात. आज मंगळवार रोजी देगलूर नाका येथील शाळेतील बारावीचे विद्यार्थी आले होते. पोहता येत नसले तरी पाण्यात गेले. त्यापैकी एकजण काठावर



बसून होता.

सकाळी साडे नऊच्या सुमारास पोहण्यासाठी पाण्यात उतरले असता पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने शेख फुज्जाइल, काजी मुजम्मिल, आफान व सय्यद सिद्दिकी हे चार जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. यातील मोहम्मद फैजान हा बचावला आहे. बचावलेल्या मुलाने त्यांना बुडताना पाहून फोन वरून नातेवाईक यांना संपर्क केल्याने व घटनेची माहिती झरी येथील पोलीस पाटील यांनी सोनखेड पोलिसांना दिली. माहिती मिळताच सपोनि पांडुरंग माने यांनी तात्काळ वरिष्ठना माहिती देऊन व जीवनरक्षक यांना पाचरण केले. तीन ते चार तासाच्या अथक परिश्रमानंतर गोदावरी जीवन रक्षकांनी चारही जणांचे मृतदेह बाहेर काढले व सोनखेड पोलिसांनी उत्तरीय तपासणीसाठी विष्णुपुरी येथील शासकीर रुग्णालयात पाठवले. यावेळी घटनास्थळी अप्पर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर, तलाठी मारोती कदम आदी उपस्थित होते.

## बिडकीन येथे जलवाहिनीचे ठेकेदार ग्रामपंचायतच्या पत्राला जुमानता नसल्याने अखेर ग्रामपंचायत व नागरिकांनी रस्त्यावर उतरून केले काम बंद

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. १३ ऑगस्ट पैठण तालुक्यातील बिडकीन येथील शेकटा फाटा ते निलजगाव फाटा पर्यंत दुरवस्था झालेल्या रस्त्याची दुरुस्ती करून देणे बाबत ग्रामपंचायत सरपंच अशोक धर्मे यांनी २२ दिवसापूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जीव्हीपीआर इंजिनीअर्स ठेकेदार यांना लेखी पत्र देऊनही यांनी संबंधितांनी पत्राला केराची टोपली दाखवली असल्याचे लक्षात येताच सरपंच अशोक धर्मे सह ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील नागरिक रस्त्यावर उतरून रस्त्याची दुरुस्ती होत नाही तोपर्यंत जलवाहिनीचे काम बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे ,पैठण ते छत्रपती संभाजीनगर रोडवरील बिडकीन येथे जीव्हीपीआर इंजिनीअर्स ठेकेदार या कंपनीने जलवाहिनी पाईप लाईन टाकण्याचा काम मुद्दत मध्ये करुन देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी दिले असताना सुद्धा जीव्हीपीआर इंजिनीअर्स ठेकेदार तीन महिन्यापासून कामामध्ये चाल ढकल करत असल्याने या जलवाहिनीच्या



**शेकटा फाटा ते निलजगाव फाटा २५०० मि मि जलवाहिनी पाईप लाईन टाकण्याचे काम चालू आहे तोपर्यंत बिडकीन मधून जड वाहतूक बंद करण्यात यावे व जड वाहतूक एमआयडीसी बिडकीन मधून वळवण्यात यावे असे पत्र सर्वोच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी सर्व संबंधित अधिकारी यांना काढण्यात आले होते परंतु आजपर्यंत जलवाहिनीचे काम सुरू असून सुद्धा जड वाहतूक बिडकीन मधून रात्र दिवस जड वाहतूक सुरु आहे.जलवाहिनीचे काम चालू आहे तोपर्यंत बिडकीन मधून जड वाहतूक बंद करण्यात यावी अशी मागणी ग्रामपंचायत सरपंच अशोक धर्मे व सदस्य,स्थानिक नागरिक करत आहे.**

कामा मुळे शेकटा फाटा ते निलजगाव फाटा पर्यंत रोडवर खड्डे पडल्यामुळे दूर अवस्था झाली असून या खड्ड्यामध्ये जलवाहिनी टाकण्यासाठी खोदलेल्या नालीतील पाणी रोडवरती सोडल्याने रोड वरती मोठाले खड्डे पडल्याने त्यामध्ये पाणी साचत असल्याने रहदारीसाठी व नागरिकांना नाहक मोठा त्रास सहन करावा लागत आहे या संदर्भात बिडकीन ग्रामपंचायत सरपंच अशोक धर्मे यांनी दि. २३ जुलै रोजी संबंधित विभागांना लेखी पत्र दिले होते या पत्राकडे दुर्लक्ष केल्याने अखेर आज दि. १३ रोजी सकाळी बारा वाजता जलवाहिनीचे काम बंद आंदोलन करण्यात आले याप्रसंगी जिल्हा परिषद माजी बांधकाम सभापती विलास भुमरे यांना भेट देऊन जीव्हीपीआर इंजिनीअर्स ठेकेदार अग्रवाल यांना फोन द्वारे माहिती दिली, व कामावरील कर्मचारी यांना रस्ता दुरुस्त करून देणे बाबत सूचना दिल्या, यावेळी ग्रामपंचायत सरपंच अशोक धर्मे, रमेश शिंदे,सागर फरताळे, अंकुश धर्मे, प्रवीण चव्हाण, विकास गोर्डे, मोहन हिवाळे, मधुकर सोकटकर, किरण गुजर, ज्ञानेश्वर कांबळे, अविनाश राठोड,स्थानिक नागरिक, पत्रकार, मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## आ. प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली १०४ भाविक अष्टविनायक यात्रेसाठी रवाना



खुलताबाद प्रतिनिधी – गंगापूर गंगापूर खुलताबाद तालुक्याचे आमदार आदरणीय प्रशांतजी बंब यांच्या मार्गदर्शनाखाली आज वडोद खुर्द वडोद बुद्रुक माटरगाव व भडजी या चार गावातील १०४ भाविक आज अष्टविनायक यात्रेसाठी दोन खाजगी लक्झरी बसेस च्या माध्यमातून भद्रा मारुती दर्शन घेऊन रवाना करण्यात आले. आतापर्यंत गंगापूर खुलताबाद मतदार संघातील नऊ ते दहा हजार वयोवृद्ध भाविकांना अष्टविनायक यात्रा तसेच बौद्धगया दर्शन यात्रा व अजमेर शरीफ यात्रा या देवतांचे दर्शन वेगवेगळ्या गावातील भाविकांचे दर्शन घडवून आणले आहे. यावेळी उपस्थित भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे, पंचायत समिती माजी सभापती गणेश नाना आधाने, माजी पंचायत समिती सभापती दिनेश अंभोरे, प्रकाश चव्हाण, शहराध्यक्ष परसराम बारगळ, , ज्ञानेश्वर पाटील बारगळ, माजी नगरसेवक योगेश बारगळ, युवा मोर्चा शहराध्यक्ष राहुल हजारे , राहुल चव्हाण ,अनिल करपे, सुभाष ठोंबरे ,सुरेश मालोदे, मोहन तुपे, काशिनाथ तुपे ,शंकर आंभोरे, अशोक तुपे, युवराज दांडेकर ,भाऊसाहेब बारगळ आदी उपस्थित होते .

## बजाजनगरातील अंतर्गत रस्त्यावर पांढरे पट्टे मारण्याचे काम सुरु



वाळूज महानगर : बजाजनगरातील मोहटादेवी ते सिडको कडे जाणाऱ्या रस्त्यावर एमआयडीसीच्या वतीने गतिरोधक टाकण्यात आले होते परंतु गतिरोधकाची उंची जास्त असल्याने तसेच त्यावर पांढरे पट्टे नसल्याने अनेकवेळा महिला दुचाकी आदळून अपघात होण्याचे प्रमाण वाढले होते. नागरीकांना या विषयी ओरड केल्यानंतर या मार्गावरील गतिरोधकावर पांढरे पट्टे मारण्याचे काम सुरू झाले आहे. बजाजनगरातील मोहटादेवी ते सिडको कडे जाणाऱ्या रस्त्यावर वर्दळीमुळे अपघातांची जास्त शक्यता असल्याने तिथे गतिरोधक व्हावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली होती. त्यांच्या मागणीला यश येऊन काही दिवसापूर्वीच या रस्त्यावर गतीरोधक उभारण्यात आले होते परंतु त्यावर पांढरे पट्टे नसल्याने वाहन आदळून अपघाताचे प्रमाण वाढले होते. याची अनेक प्रसिद्धी माध्यमाने दखल घेत वृत्त प्रकाशित केले होते. या रस्त्यावर शाळेतील मुले, ज्येष्ठ नागरिक यांची वर्दळ जास्त प्रमाणात असते. येथे अपघात होत असल्याने या गतिरोधकांवर रंबलर स्ट्रीप किंवा पांढरे पट्टे मारण्याच्या ग्रामस्थांच्या मागणीला अखेर यश आले असून प्रत्यक्ष कामाला प्रारंभ झाला आहे.

## सूर्यभान वाघ याचे सर्प चावल्याने निधन



सिल्लोड प्रतिनिधी : औराळा ता कन्नड यथील शेतकरी सूर्यभान वाघ हे शेतात काम करत असताना त्यांना साप चावल्याने त्यांनी प्रथम औरंगाबाद यथील घाटीत नेण्यात आले परंतु सर्प विषारी असल्याने त्याचा दिनांक २८-७-२०२४ रोजी निधन झाले त्याच्या प्रश्नत बायको, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## साहेबराव पाटील यांचे निधन



कन्नड, दि.०७ ऑगस्ट – तालुक्यातील जामडी घाट येथील माजी सोसायटी चेअरमन साहेबराव राजाराम पाटील जाधव उर्फ आबा वय ६० वर्षे यांचे छत्रपती संभाजीनगर येथे खाजगी रुग्णालयात उपचारा दरम्यान प्राणज्योत मालवली, दि.०४ रोजी चाळीसगांव रोडवर सागर हॉटेल समोर सायंकाळी ०७ वाजेच्या सुमारास अपघात झाला होता,या अपघातात त्यांना गंभीर इजा झाल्याने त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले असता दि.०६ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली शोकाकुल वातावरणात त्यांचा अंतविधी कन्नड शहरातील देवलोक स्मशानभूमी कॉलेज रोड कन्नड येथे दुपारी तीन वाजता झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं, सुना, नातवंड जावई असा परिवार आहे. कृषी सेवा केंद्र चालक मयूर जाधव व रवींद्र जाधव यांचे ते वडील होते.

# स्वस्त धान्य दुकानदारांनी ईपॉश मशीन केले जमा

## नेटवर्क व कायम सर्व्हर डाऊनमुळे धान्य वाटपात अडथळे

तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.०७ : तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांनी सतत नेटवर्क नसने व कायम सर्व्हर डाऊन होत असल्याने ऑन लाईन धान्य वाटपाचे ई- पॉश मशीन शासनाकडे जमा करून कन्नड तालुका रास्त भाव दुकानदार संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले. तहसिलदार विद्याचरण कडवकर यांना संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले.



शासनाकडून राशनच्या मालाचे वाटप ऑनलाइन पद्धतीने व्हावे त्यामध्ये सुसूत्रता यावी म्हणून महाराष्ट्रातील स्वस्त धान्य दुकानदारांना धान्याचे वाटप करण्यासाठी ई -पॉश मशीन देण्यात आलेले आहे, परंतु धान्य आहे परंतु इंटरनेट नाही व सर्व्हरच्या अडचणीमुळे धान्य वितरण करता येत नाही, इंटरनेट सेवा, सर्व्हर डाऊनचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यात यावा, अंगठा आहे, पण मशीनवर फिंगर घेता येत नाही, एकाच अंगठ्यामध्ये सर्व योजनेचा माल अपेक्षीत आहे पण तसे न होता अनेक वेळा प्रत्येक योजनेचे वेगवेगळा अंगठा घेत असल्याने तासंतास ग्राहकांना ताटकळत राहावे लागते व वितरणामध्ये अडथळे निर्माण होत आहे.

केवायसी साठी आम्ही शासनास मदत करीत आहोत. पण इंटरनेट प्रोब्लेम असल्याने काम करण्यास अडथळे येत आहे. केवायसी करण्यासाठी बाहेर इतर सेवा केंद्रावर १५० रुपये प्रती व्यक्ती घेतले जातात, आम्ही करत असलेल्या केवायसीचा मोबादला कमीत कमी प्रति सदस्य ५० रूपये देण्यात यावा अशी मागणी आहे. महागाईच्या इष्टाकां नुसार प्रती क्विंटल तीन शे रूपये कमीशन देण्यात यावे. एपीएल कार्ड धारक यांना धान्य विकत मिळावे. किंवा ज्या एपीएल शेतकरी कार्ड धारकांच्या नावावर शेती नाही किंवा भुमीहीन, बेरोजगार, अपंग यांना मोफत धान्य मिळविण्यासाठी दुकानदारांच्या मागणीनुसार पी.एच.एच. अंत्योदय (पीएचएच) योजनेमध्ये सामाविष्ट करावा. लाभार्थ्यांना वेळेचे आत धान्य वाटप करण्यासाठी ऑफलाईन वाटप कायमस्वरूपी ठेवण्यात यावे आदी मागण्याचे निवेदन ई- पॉश मशीन जमा करून अखिल महाराष्ट्र राज्य कन्नड तालुका संघटनेच्या अध्यक्षा सुनिता सुखदेव कदम यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.

## आपल्या नोकरी बरोबर एकनिष्ठ राहणाऱ्याचा सन्मान होतो : कल्पना पदकोंडे

तभा वृत्तसेवा

कन्नड – दि.०६ ऑगस्ट – नोकरदार वर्गाने आपल्याला मिळालेल्या कामात नेहमीच गुंतुन घेतले पाहिजे. आपल्या नोकरीशी एकनिष्ठ राहुन आपल्या मिळालेली सेवा जी व्यक्ती प्रामाणिकपणे करते त्या व्यक्तीचा सेवापुर्ती सोहळा नक्कीच चांगला होतो. आणि सेवापुर्ती नंतरचे आयुष्य देखील आनंदात जाते असा विश्वास शिक्षण विस्तार अधिकारी कल्पना पदकोंडे यांनी शुक्रवारी व्यक्त केला. कन्नड तालुक्यातील शेरोडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत असलेल्या




मुख्यध्यापिका पंचफुला व्होलप (निकम) यांच्या सेवापुर्ती सोहळा औराळा येथील कन्यादान मंगल कार्यालयात जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अण्णासाहेब शिंदे, छत्रपती संभाजीनगर पंचायत समितीच्या शिक्षण विस्तार अधिकारी कल्पना पदकोंडे, शेरोडीचे सरपंच जयेष बोरसे, औराळ्याचे माजी सरपंच चंद्रकांत देशमुख, शालेय पोषण आहार अधिक्षक सचिन शिंदे, रामदास शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.०२ शुक्रवारी रोजी पार पडला त्यावेळी कल्पना पदकोंडे बोलत होत्या. यावेळी पंचफुला व्होलप, पंकज निकम, युगंधरा निकम, सचिन शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. देसले यांनी सुत्रसंचालन तर केंद्र प्रमुख योगेश मुळे यांनी आभार मानले. यावेळी औराळीच्या सरपंच संगिता निकम, रतन वारे, माजी सरपंच भारत निकम, वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष देविदास राठोड, प्रभारी सरपंच आकाश पगारे, विठ्ठल गुजराणे, विकास जिवरख, दिपक वारे, अविनाश काळे आदिसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## आचार्य गुप्तीनंदजी गुरुदेव यांचा ५२ वा वर्धनोत्सव उत्साहात साजरा

## हजारो भाविकांनी घेतले आचार्य.गुप्तीनंदी गुरुदेव यांचे दर्शन

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) – कचनेर जवळील धर्मतीर्थ क्षेत्र येथे आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव यांचाा २०२४ चा चातुर्मास उत्साहात सुरु असुन आचार्यश्रींच्या सानिध्यात आज ५२ वा जन्मदिवस हजारो भाविकांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. सकाळी ६ वाजेपासुनच जन्म दिवसानिमीत्त आचार्यश्रींचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. यावेळी नवग्रहतीर्थ वरुरचे भटटारक धर्मसेन महाराज व कोल्हापुर मठाचे लक्ष्मीसेनजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी जन्मदिवासा निमीत्त नागपुर येथील नितीन नखाते ,राजेश जैन यांनी आचार्य गुप्तीनंदी गुरूदेव यांचे पादपक्षालन व पुजा करण्याचे सौभाग्य मिळाले तसेच गुरुदेवांना पिच्छी देण्याचा मान संजीव जैन लखनौ यांना मिळाला.तसेच शास्त्र देण्याचा मान होलास आशा रोमील सोनी इंदौर यांना मिळाला तर कमंडल भेट चा मान मनोज रजनी जैन परिवार बाराबंकी यांना मिळाला. तसेच माला भेट देण्याचा मान महावीर कुसुम साक्षी गंगवाल यांना मिळाला. यावेळी मिलन सुनिधी अमित जैन परिवाराकडुन महामृत्युंजय विधान संपन्न झाले. सर्व प्रथम सकाळी भगवान शांतीनाथांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. याम ध्ये महाशांतीधारा, वास्तुविधान, नवग्रह होम, प्रतिष्ठाचार्य पंडीत मधुर जैन यांच्या मंत्रोपचाराने करण्यात आले. सर्व प्रथम कार्यक्रमाचे दिप प्रज्वलन प्रमोद आनंद जैन,श्रीमती.सुधा संजीव झवेरी परिवार, आशा रोमील सोमी परिवार, मिलन अमित जैन परिवार, रविंद्रकिरण पाटील परिवार, सुभाष कासलीवाल, ललीत पाटणी, विनोद लोहाडे, भरत ठोले, आर.आर.पहाडे, प्रमोद जैन चंद्रशेखर पाटनी गुलाबचंद कासलीवाल राजेंद्र पाटनी आदी मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे मंगलाचरण आस्थाश्री माताजी यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नितीन नखाते, संजय पापडीवाल, किर्ती पाटणी यांनी केले.

## जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

कि.दि.अर्ज क्र.३०७/२०२४

अर्जदार : १) संगिता भ. संजय भोसले वय ४८ वर्षे, धंदा घरकाम रा. लक्ष्मी कॉलनी, गंगापुर ता. गंगापुर ह.मु. शिक्षक कॉलनी, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) तुषार संजय भोसले वय २९ वर्षे, धंदा मजुरी, रा. समतानगर, गंगापुर ता. गंगापुर ह.मु. शिक्षक कॉलनी, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) निखील संजय भोसले वय २२ वर्षे, धंदा शिक्षण रा. ह.मु. शिक्षक कॉलनी, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) कांचन भ्र. दिपक चव्हाण, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम रा. भगुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत. उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. श्री. वाय एन. जाधव यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.२ व ३ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.४ ही त्यांची वहिण आहे व अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची जनकमाता आहे. सर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे संजय तुळशिराम भोसले हे गंगापुर ता. गंगापुर गंगापुर पैथी येथील रहिवाशी होते ते दिनांक ११/०२/२०२४ रोजी आजारपणात वैद्यकीय उपचारादरम्यान मयत झालेले आहे. मयत संजय तुळशिराम भोसले यांना अर्जदार क्र.१ ही विधवा पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ ही मुले व अर्जदार क्र.४ ही विवाहीत मुलगी असे कायदेशीर वारस असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे सांगुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदुतीनंतरचा आक्षेप – उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०६/०८/२०२४ दिले.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

कि.दि.अर्ज क्र. ३२०/२०२४

अर्जदार : १) संगिता भ्र. कृष्णा जाधव, वय २६ वर्षे, धंदा घरकाम रा. अव्दलपुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) राधिका पि. कृष्णा जाधव वय ०९ वर्षे, धंदा शिक्षण रा. अ.पा.क. आई अर्जदार क्र.३ ३) श्रीराम पि. कृष्णा जाधव वय ०३ वर्षे, अ.पा.क. आई अर्जदार क्र.३ ४) इंदुवाई पुंजाराम जाधव वय ६० वर्षे, धंदा शेती व घरकाम रा. अव्दलपुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. श्री. वाय एन. जाधव यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.२ व ३ हे आपसांत नात्याने सख्खं वहिणे भाऊ असुन अर्जदार क्र.१ ही त्यांची आई आहे व अर्जदार क्र.४ ही अर्जदार क्र.२ व ३ यांची आजी बडीलांची आई) असुन अर्जदार क्र.१ ची सासु आहे. अर्जदार क्र.१ चे पति, अर्जदार क्र.२ व ३ पीचे पिता, व अर्जदार क्र.४ चा मुलगा नामे कृष्णा पुंजाराम जाधव हा मौजे अब्दलपुर ता. गंगापुर येथील रहिवाशी होता तो दिनांक ०३/१०/२०२३ रोजी मौजे अब्दलपुर मयत झालेला आहे. मयत कृष्णा पुंजाराम जाधव यांना अर्जदार क्र.१ ते ४ कायदेशीर वारस असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदारनसल्याचे सांगुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदुतीनंतरचा आक्षेप – उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०६/०८/२०२४ दिले.

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

# गंगापूर वकील संघाच्या वतीने उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड यांच्या बदलीला स्थगितीची मागणी

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री यांना ई-मेलद्वारे निवेदन

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.६: उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जराड यांची प्रशासकीय बदली रद्द करण्याची मागणी गंगापूर वकील संघाचे वतीने करण्यात आली.

वकील संघ गंगापुर च्या वतीने जिल्हा अधिकारी यांना निवेदन मेल करून व यांच्या मार्फत महाराष्ट्र शासन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री व महसूल मंत्री यांना गंगापूर वकील संघाच्या वतीने निवेदनाद्वारे अशी मागणी करण्यात आली आहे.

उपविभागीय अधिकारी डॉ. अरूण ज-हाड, प्रामाणिकपणे अतिशय चांगले काम करतात व कर्तव्य दक्ष अधिकारी असुन कोणत्याही आमीशाष बळी न पडता आपले कार्य व कर्तव्य चोख करतात व तालुक्यातील गोरगरीब जनते करिता २४ तास उपलबध असतात व त्यांचे सर्व प्रश्न सोडवतात व त्यांना नेहमी न्याय देण्याचे काम करतात. उपविभागीय अधिकारी डॉ. अरूण ज-हाड, यांना एक वर्षे सुध्दा झालेले नाही त्यांची बदली म्हणजेच अन्याय कारक असुन असे अधिकारी लाभणे शक्य नाहीत.


वकील संघाचे सुध्दा महसुल प्रकरणात अतिशय चांगले काम करतात व त्याचे निर्णय अतिशय उत्तम असुन कोणावरही अन्याय कारक नसतात. करिता. उपविभागीय अधिकारी डॉ. अरूण ज-हाड, कार्यालय वैजापुर यांच्या बदलीस तत्काळ स्थगिती देउन रदद करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे या निवेदनावरअड. ए. एस. करडे, एस. के. दळवी, एस. के. अंबेकर, ए. बी. कुलकर्णी, जोशी, राऊत, कराळे, वाय. एन. जाधव, चव्हाण, जाधव,मनोरकर,शिराळे, यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सेवानिवृत्त सैनिक गजानन लाड यांची घोड्यावर मिरवणूक

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.६ ऑगस्ट

सोयगाव शहरात गजानन लाड हे सैन्य दलातून सेवानिवृत्त झाल्याने रविवारी सोयगाव शहरात आगमन होताच सायंकाळी सहा वाजता सोयगाव व आमखेडा गावात गजानन लाड यांची घोड्यावर मिरवणूक काढण्यात आली होती.सोयगाव येथील जुना बाजार पेठ पासून सुरू झालेली मिरवणूक सोयगाव बस स्टॅन्ड,गजानन महाराज मंदिर मार्गे शिवाजी नगर आदी भागांतून आमखेडा गावात पोहचली रात्री उशीरा पर्यंत मिरवणूक सुरू होती.२४ वर्ष भारतीय सैन्य दलात सेवा बजावून सोयगाव शहरातील गजानन शंकर लाड हे सेवानिवृत्त होऊन रविवारी सोयगाव येथे आले असता गावातील त्यांच्या मित्र परिवाराने त्यांची वाजत गाजत घोड्यावर बसवून सोयगाव व आमखेडा या दोन्ही



गावातून मिरवणूक काढली ठिकठिकाणी गावातील महिलांनी त्यांचे औक्षण करून त्यांच्या कार्याला मानवंदना दिली सन.२००० मध्ये वयाच्या २१ व्या वर्षी गजानन लाड हे भारत मातेचे सेवेसाठी भारतीय सैन्य दलात रुजू झाले पुणे येथे त्यांची ट्रेनिंग संपल्यानंतर पहिली सेवा त्यांची पंजाब येथील भटिंडा येथे झाली तेथे काही काळ सेवा बजावल्यानंतर त्यांची कारगिल येथे बदली झाली २४ वर्षाच्या सेवाकाळात त्यांनी तब्बल १२ वर्ष हा काळ भारतीय सीमेवर घालवला.पोखरण व कारगिल येथील त्यांचा सेवाकाळ हा खूप संघर्षमय होता असे त्यांनी सांगितले.या मिरवणुकीमध्ये त्यांचे वर्गमित्र,कुटुंबातील सर्व सदस्य व गावकरी तसेच सर्व समाज बांधव त्यांच्या मिरवणुकीला उपस्थित होते.

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.
आदेश/प्र.क्र.२२५२/कावि-२२८८
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक :-३०.०७.२०२४.

## जाहिर प्रगटन

अर्जदार :- शेख उजमा बेगम शेख सिराज, वय-३० वर्ष व्यवसाय- घरकाम, रा. अब्दालशाहनगर सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी शेख उजमा बेगम शेख सिराज, रा. अब्दालशाहनगर सिल्लोड, ता. सिल्लोड छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा दिनांक १८.०६.१९९४ रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, शेख उजमा बेगम शेख सिराज, यांचा दिनांक १८.०६.१९९४ रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.
आदेश/प्र.क्र.२२५१/कावि-२२८५
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक :-३०.०७.२०२४.

## जाहिर प्रगटन

अर्जदार :- शकीला बेगम शेख आशक हुसैन, वय-५३ वर्ष व्यवसाय- घरकाम, रा. अब्दालशाहनगर सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी शकीला बेगम शेख आशक हुसैन, रा. अब्दालशाहनगर सिल्लोड, ता. सिल्लोड छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा दिनांक ०१.०१.१९७१ रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, शकीला बेगम शेख आशक हुसैन, यांचा दिनांक ०१.०१.१९७१ रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर /आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.
आदेश/प्र.क्र.२२८७/कावि-२२८९
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक :-३०.०७.२०२४.

## जाहिर प्रगटन

अर्जदार :- शेख सरताज शेख सिराज, वय-३४ वर्ष व्यवसाय- घरकाम, रा. अब्दालशाहनगर सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी शेख सरताज शेख सिराज, रा. अब्दालशाहनगर सिल्लोड, ता. सिल्लोड छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा दिनांक ०८.०३.१९९० रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, शेख सरताज शेख सिराज, यांचा दिनांक ०८.०३.१९९० रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.
आदेश/प्र.क्र.२२४८/कावि-२२८६
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक :-३०.०७.२०२४.

## जाहिर प्रगटन

अर्जदार :- शेख सरफराज शेख सिराज, वय-२५ वर्ष व्यवसाय- मजुरी, रा. अब्दालशाहनगर सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी शेख सरफराज शेख सिराज, रा. अब्दालशाहनगर सिल्लोड, ता. सिल्लोड छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा दिनांक १२.०६.१९९९ रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, शेख सरफराज शेख सिराज, यांचा दिनांक १२.०६.१९९९ रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर / आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.
आदेश/प्र.क्र.२२४९/कावि-२२८७
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक :-३०.०७.२०२४.

## जाहिर प्रगटन

अर्जदार :- रेशमा परवीन शेख सिराज, वय-३३ वर्ष व्यवसाय- मजुरी, रा. अब्दालशाहनगर सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी रेशमा परवीन शेख सिराज, रा. अब्दालशाहनगर सिल्लोड, ता. सिल्लोड छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा दिनांक २०.०४.१९९१ रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, रेशमा परवीन शेख सिराज, यांचा दिनांक २०.०४.१९९१ रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## उमरगा शहरातील विकासकामांसाठी आणखी १२ कोटी रू. मंजुर

### आमदार ज्ञानराज चौगुले यांची माहिती...



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ ऑगस्ट -**

उमरगा शहरातील विविध भागांत अंतर्गत रस्ते, नाली, सभामंडप, परिसर विकास आदी कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडुन आणखी १२ कोटी रू. निधी मंजुर झाल्याची माहिती आमदार ज्ञानराज चौगुले यांनी दिली आहे.

सदर कामांना मंजुरी व निधी उपलब्ध करून दिल्याबददल त्यांनी मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचे आभार मानले आहेत.



## ▶▶संक्षिप्त वृत्त...



### अनिकेत बारकुल यांचा सत्कार

**येरमाळा, दि.६ ऑगस्ट -**

राज्य पात्रता परिक्षा (एसईटी) एप्रिल-२०२४ ला झालेल्या परिक्षेचा निकाल जाहीर झाला असुन त्यामध्ये येरमाळा येथील अनिकेत अश्रूबा बारकुल यांनी भौतिकशास्त्र विषयामध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. सध्या ते येरमाळा येथील ज्ञानोद्योग उच्च माध्यमिक विद्यालयात तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत आहेत. या यशाबद्दल त्यांचा सत्कार समारंभ विद्यालयात घेण्यात आला. यावेळी सत्कार कार्यक्रमासाठी प्रा. सुनिल पाटील, प्रा. शिंदे, प्रा. फुगारे प्रा. विनोद बारकुल प्रा. सयाजी बारकुल, प्रा. जाधव, प्रा. कोकाटे, प्रा. कळसे, अजित बारकुल व बाबासाहेब बारकूल हजर होते. बारकुल यांचा कॉलेजचे प्राचार्य एस.एल. पौळ, संस्थेचे उपाध्यक्ष आबासाहेब बारकुल, अंकुश पाटील, शालेय समितीचे अध्यक्ष भाऊसाहेब बारकुल व शालेय सदस्यांकडुन सत्कार करण्यात आला.



### 'रुपामाता'ला दिपस्तंभ पुरस्कार प्रदान

**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

धाराशिव जिल्ह्यातील रुपामाता अर्बन को. ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटीने ठेवीदार व ग्राहकांची विश्वासार्हता संपादित करून सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी व महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळीसाठी दिपस्तंभाप्रमाणे कार्य करुन पतसंस्थेला चांगली दिशा देऊन दिशादर्शक बनण्याचे कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबई यांच्या वतीने तब्बल चौथ्यांदा सहकार क्षेत्रातील मानाचा व प्रतिष्ठित असा राज्यस्तरीय २०२३-२४ चा दीपस्तंभ पुरस्कार हैदराबाद या ठिकाणी दि.३ ऑगस्ट रोजी एका कार्यक्रमात कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे आणि पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेचे विश्वस्थ ॲड. व्यंकटराव गुंड, शंकर गाडे व मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यनारायण बोधले, विभाग प्रमुख खोत सागर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.



### शंकर खामकर यांची निवड

**भूम, दि.६ ऑगस्ट -**

राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यीक व कलावंत मानधन सन्मान योजना जिल्हास्तरीय समितीवर सदस्य म्हणून ज्येष्ठ पत्रकार शंकर खामकर यांची निवड झाली. या निवडीबदल त्यांचा भाजपा भूम तालुक्याच्यावतीने पक्ष कार्यालयात सत्कार करण्यात आला. सोमवार दि.५ ऑगस्ट रोजी भूम तालुक्यातील शंकर विठ्ठल खामकर यांची राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेच्या जिल्हा स्तरीय समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती झाल्याचे लेखी आदेश पत्र सदस्य सचिव तथा जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी धाराशिव यांच्या सहीचे प्राप्त झाले.

### कमलबाई आडसूळ यांचे निधन

**कळंब, दि.६ ऑगस्ट -**



तालुक्यातील भोगजी येथील जेष्ठ समाज सेविका कमलबाई दत्तात्रय आडसूळ (वय ७०) यांचे दि.४ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजता भोगजी येथे वृद्धापकाळाने निधन झाले. दि.५ ऑगस्ट रोजी त्यांच्या शेतात भोगजी येथे अंत्यविधी करण्यात आला. कमलताई यांनी १९८५ ते १९९३ पर्यंत विविध सामाजिक कार्यात हिराहिरीने भाग घेऊन लोकांच्या विरोधाला आणि पुरुषी मानसिकतेला न जुमनता दुष्काळ निवारण, महिलांचे सक्ष्मीकरण, आर्थिक साक्षरता महिलांना व्हावी यासाठी महिला बचत गट चळवळ भोगजी आणि परिसरातील गावात उभी केली होती. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुन, तीन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### निलावती बल्लाळ यांचे निधन

**परंडा, दि.६ ऑगस्ट -**



परंडा तालुक्यातील जाकेपिंपरी येथील निलावती पांडूरंग बल्लाळ (वय ७०) यांचे दि.४ रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर जाकेपिंपरी येथे दि.५ रोजी सकाळी ९ वाजता शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. अनाळा येथील न्यू हायस्कुल शाळेचे शिक्षक विठ्ठल बल्लाळ व जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक अप्पासाहेब बल्लाळ यांच्या त्या आई होत.

## श्री तुळजाभवानी मंदिरातील भ्रष्टाचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश

### जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षकांना २ सप्टेंबरला प्रत्यक्ष हजर राहण्याचे कोर्टाचे आदेश...





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानात भ्रष्टाचार करणाऱ्यांच्या विरोधात उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे गुन्हे दाखल केले नाहीत; म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपिठाचे न्यायमूर्ती रविंद्र घुगे आणि न्यायमूर्ती वाय.जी. खोब्रागडे यांनी महाराष्ट्र राज्याच्या गृह विभागाचा अतिरिक्त कार्यभार पाहणाऱ्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांना अवमाननेची साधी नोटीस पाठवली आहे. तसेच धाराशिव जिल्हाचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे आणि पोलीस अधीक्षक यांना प्रत्यक्ष उच्च न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. यापूर्वी न्यायालयाने दिलेले निर्देश न पाळल्याने हिंदु जनजागृती समितीने ही अवमानना याचिका दाखल केली होती.

वर्ष १९९१ ते २००९ या काळात श्रीतुळजापूर मंदिर संस्थानाच्या दानपेटीच्या लिलावात ८ कोटी ४५ लाख ९७ हजार रुपयांचा भ्रष्टाचार झाला. तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी दिलेल्या निर्देशानुसार वर्ष २०११ मध्ये या घोटाळ्याची राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी चालू झाली; मात्र यात प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी गुंतलेले असल्यामुळे ५ वर्षे झाले, तरी चौकशी पुढे सरकत नव्हती. मात्र भक्तांच्या आस्थेचा विषय असल्यामुळे हिंदु जनजागृती समितीने हिंदु विधीज्ञ परिषदेच्या साहाय्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपिठात वर्ष २०१५ मध्ये जनहित याचिका दाखल केली होती. गेली अनेक वर्षे 'हिंदु विधिज्ञ परिषदे' चे अधिवक्ता सुरेश कुलकर्णी यांनी हे प्रकरण लावून धरल्यानंतर ९ मे २०२४ या दिवशी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपिठाने भ्रष्टाचारात दोषी ठरवलेले लिलावदार, मंदिर कर्मचारी, विश्वस्त, शासकीय अधिकारी-कर्मचारी आदी १६ दोषींवर तुळजापूर पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. तसेच या भ्रष्टाचारात सरकारी अधिकारी गुंतले आहेत, म्हणून प्रशासन त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहे', असे ताशेरे ओढत या घोटाळ्याचा तपास बंद करण्याचा शासनाचा निर्णय छत्रपती संभाजीनगर खंडपिठाने रद्दबातल ठरवला. तसेच या प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस अधीक्षक दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली चालू ठेवण्याचे आदेशही दिले होते; मात्र या आदेशाचे पालन राज्य शासनाने केले नाही. याविरोधात हिंदु जनजागृती समितीने महाराष्ट्र शासनाचे अतिरिक्त मुख्य सचिव (गृह विभाग), पोलीस महासंचालक, जिल्हा पोलीस प्रमुख धाराशिव, जिल्हाधिकारी धाराशिव यांना प्रतिवादी करत अवमानना याचिका दाखल केली. या प्रकरणाची सुनावणी १ ऑगस्ट रोजी झाली. हिंदु जनजागृती समितीच्या वतीने 'हिंदु विधिज्ञ परिषदे' चे अधिवक्ता सुरेश कुलकर्णी आणि अधिवक्ता उमेश भडगावकर यांनी या वेळी कामकाज पाहिले.

यावर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती वाय.जी. खोब्रागडे यांच्या द्विसदस्यीय पिठाने महाराष्ट्राच्या अतिरिक्त मुख्य सचिव (गृह विभाग) यांना साधी कारणे दाखवा नोटीस काढली; मात्र जिल्हाधिकारी धाराशिव आणि जिल्हा पोलीस प्रमुख धाराशिव यांना प्रत्यक्ष २ सप्टेंबर २०२४ रोजी न्यायालयासमोर प्रत्यक्ष हजर रहा, असा आदेश केला. या वेळी उच्च न्यायालयाने प्रतिवादींना नोटिस काढताना असे स्पष्ट शब्दात आदेशित केले की 'केवळ अवमानना याचिका उच्च न्यायालयात चालू आहे, या कारणांनी गुन्हे नोंदवण्याचे काम थांबवायचे आवश्यकता नाही.' असेही न्यायालयाने म्हटले आहे.

## नळदुर्गला तालुका दर्जा देण्यासाठी राज ठाकरे मुख्यमंत्र्याशी बोलणार



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.६ ऑगस्ट -**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे धाराशिव येथे विधानसभा निवडणुकीसंदर्भात चाचपणी करण्यासाठी व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आले होते. याप्रसंगी नळदुर्ग मनसेच्या पदाधिकाऱ्यांना आवर्जून भेटीसाठी त्यांनी बोलावले. यावेळी नळदुर्गला तालुक्याचा दर्जा देण्यासाठी स्वतः मुख्यमंत्र्यांशी बोलणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मनसेचे शहराध्यक्ष अलिम शेख, शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी यांनी नळदुर्ग तालुका होण्यासाठी पक्षाच्या वतीने वेळोवेळी आवाज उठवला व शासनाकडे १२५ पानी अहवाल दिला असून आहे. वर्षभरापूर्वी शासनाने कोकण विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नवीन तालुके निर्मितीसाठी समिती गठीत केली आहे.त्या समितीची भेट घेऊनही निवेदन व अहवाल दिल्याचे सांगितले.

गेल्या ४९ वर्षांपासूनची नळदुर्ग तालुक्याची मागणी असून, अप्पर तहसील कार्यालय निर्मितीचा विषय सुद्धा बाजूला पडल्याचे सांगितले. यावेळी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यासंदर्भात मुख्यमंत्री यांच्याशी व संबंधिताशी बोलू, असे पदाधिकाऱ्यांना आश्वासित केले आहे.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष महेश जाधव, जिल्हा सचिव ज्योतिबा येडगे, तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन कुंभार, विधानसभा अध्यक्ष मयूर गाढवे, तालुका सरचिटणीस गणेश पाटील, अलिम शेख, प्रमोद कुलकर्णी, सूरज चव्हाण, गणेश बिराजदार, सोमेश्वर आलूरे उपस्थित होते.

## अवैधरीत्या गौणखनीजाचे उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ ऑगस्ट -**

सोलापुर-हैद्राबाद राष्ट्रीय राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम सध्या सुरु असुन नळदुर्ग येथील बायपास रस्ता ते मुर्टा पाटी पर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गालगत रात्रीच्या अंधारात मोठ्याप्रमाणात गौणखनीजाचे उत्खनन करून त्याची विक्री केली जात आहे. या अवैधरीत्या होत असलेल्या गौणखनीज उत्खननाची महसुल विभागाने तात्काळ दखल घेऊन अवैधरीत्या गौणखनीजाचे उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

नळदुर्ग ते सोलापुर राष्ट्रीय महामार्ग क्र.६५ वरील नळदुर्गजवळील गोलाई चौक ते मुर्टा पाटी पर्यंतच्या बायपास रस्त्याचे काम सध्या पुर्ण होण्याच्या मार्गावर आहे. कांही महिन्यात हे काम पुर्ण होऊन या महामार्गावरून वाहतुक सुरु होण्याची शक्यता आहे. मागील दहा वर्षांपासुन हे महामार्गाचे काम अर्ध्यावरच रखडत पडले होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण उपविभाग सोलापुर यांच्या आधीपत्याखाली हे काम सुरु आहे.

हा बायपास रस्ता तयार करीत असताना मुर्टापाटी येथे मोठ्याप्रमाणात गौणखनिजाचे उत्खनन केले जात असुन या रस्ता कामासाठी मुरूम, खडी व डस्ट वारण्यात आले आहे. अन्यथा अवैधरीत्या गौणखनिजाची चोरून विक्री करणाऱ्यांकडुन याठिकाणी मोठया प्रमाणात चोरी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

महसुल विभागाने याठिकाणी स्थळ पाहणी केल्यास यामागचे गौडबंगाल उघडकीस येण्याची शक्यता आहे.

## विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देवून सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ ऑगस्ट -**

नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रचार्यपदी डॉ. सुभाष राठोड यांची नियुक्ती झाल्याबद्दल शिवम् कॉम्प्युटर एज्युकेशनच्या वतीने त्यांच्या सत्काराचा तसेच विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास शशिकांत पुदाले प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, विद्यार्थ्यांचे पालक मल्लिकार्जुन गायकवाड, अवधुत चव्हाण हे उपस्थीत होते.

## पशुसंवर्धन शिबिरास खानापूर येथे उस्फुर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

१ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट पशुसंवर्धन पंधरवडा अंतर्गत जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय धाराशिवच्या अंतर्गत खानापूर (ता.जि धाराशिव) येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये जंत निमूलन, लसीकरण, वंध्यत्व निवारण उपचार, दूध अनुदान, अडचणींचे निराकरण, खाद्याबाबत माहिती, एनएलएम योजनेबाबत माहिती व प्रसिद्धी इत्यादी बाबत माहिती व पशु शिबीर घेण्यात आले.



या शिबिरास गावातील सरपंच शालन सातपुते, सुधाकर निकम उपसरपंच, लक्ष्मण भोसले पाणीपुरवठा कर्मचारी, धैर्यशील पाटील संगणक चालक, ग्राम सेविका पालके, आप्पा मगर इत्यादी उपस्थित होते.शिबिरास डॉ. दीपक कदम सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांनी पशुपालकांना लसीकरण करून घेण्याचे आवाहन केले. तर डॉ. स्वप्निल जिंतपुरे पशुधन विकास अधिकारी यांनी योजनेबाबतची सखोल माहिती देऊन मार्गदर्शन केले.

यावेळी भगवान टवठेवाड, शैलेश बिराजदार, डॉ. प्रथमेश कदम, बालाजी निकम, जयसिंग गरड यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## आ. ज्ञानराज चौगुले यांचा दाळिंब ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.६ ऑगस्ट -**

दाळींब (ता.उमरगा) येथे विशेषतः मागील २ वर्षाच्या कार्यकाळात विविध मूलभूत सोयीसुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने आमदार ज्ञानराज चौगुले यांनी भरघोस असा निधी मंजूर केला आहे. त्याबद्दल ग्रामपंचायत दाळिंब व बाबा जाफरी फाउंडेशनच्या वतीने आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या भव्य अशा सत्काराचे समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्कारास उत्तर देताना आमदार चौगुले यांनी नागरिकांना मूलभूत सोयीसुविधा पुरविणे हे लोकप्रतिनिधीचे आद्यकर्तव्य असून यासाठी निधी उपलब्ध करून देणे व त्याच्या माध्यमातून विविध विकास कामे करणे ही अविरत चालणारी गोष्ट आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील नागरिकांच्या मूलभूत समस्या जाणणारा मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्याला मिळाल्याने मला प्रत्येक गावातील वेगवेगळ्या जाती धर्मांच्या उद्धारासाठी व मूलभूत सुविधा सोडविण्यासाठी भरघोस असा निधी मंजूर करून घेता आला, असे यावेळी व्यक्त केले.



त्यानंतर गावातील अनेक नागरिकांनी केलेल्या विकास कामांबद्दल आमदार ज्ञानराज चौगुले यांचा सत्कार केला व आभार व्यक्त करत पुढील काळात आमदार चौगुले यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले.

यावेळी बाबा जाफरी, बळीराम सुरवसे, शाहूराज सावंत, सरपंच रंजना सातपुते, पोलीस पाटील अश्विनी वाले, साहेबलाल कमाल, बाबुराव टिकंबरे, एकबाल पटेल, खय्युम चाकुरे, नदीम मुगळे, हनुमंत शिंदे, धीरज इंगळे, राजू कारभारी, प्रदीप मदने, अमर देशटवार, लक्ष्मीकांत कुलकर्णी, सर्व ग्रामपंचायत सदस्य व नागरिक उपस्थित होते.

## सेवानिवृत्तांचा सन्मान ही आनंदाची बाब : खा. राजेनिंबाळकर

### भाई उद्धवराव पाटील शिक्षक पतसंस्थेची ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

सहकारी संस्थांनी लोकाभिमुख होऊन काम करावे. सार्वधर्म फंडाच्या माध्यमातून नैसर्गिक आपत्ती काळात आर्थिक मदत करण्यात अग्रभागी राहवे. सहकार संस्थेत रोख स्वरूपाच्या व्यवहारा ऐवजी धनदेशाद्वारे व्यवहार करणे ही चांगली बाब आहे, असे प्रतिपादन धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केले.



ते भाई उद्धवराव पाटील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था म. धाराशिवच्या ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत रविवार दि.४ ऑगस्ट रोजी परिमल मंगल कार्यालयात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आ. कैलास पाटील, संस्था अध्यक्ष विशाल घोगरे, संस्थापक एम.डी. देशमुख, मुख्य प्रवर्तक पी.एन. चव्हाण, वसंतराव भोरे, बाळासाहेब मुंडे, संचालक मंडळ आदी उपस्थित होते. आ. कैलास पाटील म्हणाले की भाई उध्दवराव पाटील शिक्षक पतसंस्थेचा कारभार राजकारण विरहित व चांगला आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अगोदरच लाभांश सभासदांना दिला जातो हे अतिशय चांगले आहे. जो देश शिक्षण व आरोग्य मोफत देतो तोच दश विकसित व सक्षम होतो. यावेळी संस्था अध्यक्ष विशाल घोगरे, संस्थापक एम.डी. देशमुख, मुख्य प्रवर्तक पी.एन. चव्हाण आदींनी मार्गदर्शन केले. सभासदांना ९ टक्के लाभांश वाटप करण्यात आला. या सभेत ३० सेवानिवृत्त सभासदांचा सपत्नीक शाल, पुष्पहार, फेटा बांधून, सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्था अध्यक्ष विशाल घोगरे यांनी तर सूत्रसंचालन संचालक बालाजी तांबे यांनी केले. या सभेस सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जागजी प्राथमिक आरोग्य केंद्राला रिक्त जागेचे ग्रहण

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.६ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील जागजी प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत विविध प्रकारच्या जागा रिक्त असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्राला रिक्त जागेचे ग्रहण लागले आहे.

धाराशिव तालुक्यातील जागजी प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत पळसप, दाऊतपुर, काजळा, तेर, जागजी येथे आरोग्य उपकेंद्र असून प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत पळसप, दाऊतपुर, काजळा येथील आरोग्य उपकेंद्रातील आरोग्य सेवक यांची पदे रिक्त आहेत. तर जागजी व काजळा आरोग्य उपकेंद्रातील आरोग्य सेविका यांची पदे रिक्त आहेत. जागजी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत आरोग्य सेवक व आरोग्य सेविका यांची रिक्त पदे असल्यामुळे उर्वरित आरोग्य कर्मचाऱ्यावर कामाचा प्रचंड ताण पडत आहे.

जागजी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत रिक्त पदे तातडीने आरोग्य विभागाच्या वरिष्ठांनी भरण्याची मागणी नागरिकांतन होत आहे.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# संस्कृतीचे सुरुंग

एकमेकांवर मनसोक्त चिखलफेक करून व्यक्तिगत अस्तित्वाची आव्हाने थेट राजकारणाच्या ऐरणीवर आणून जनतेच्या विवंचना, समस्यांना खुंटीवर टांगत निवडणुकांना सामोरे जाण्याची महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीस कधीच न शोभणारी नवी राजनीती सध्या राज्यात उदयास आली असून, गेल्या जेमतेम तीन वर्षांच्या अल्पावधीतच ती फोफावली आहे. या नीतीने राज्याच्या नैतिकतेच्या व सभ्यतेच्या संस्कृतीस केव्हाच गिळंकृत करून टाकले. सूडभावना आणि एकमेकांस संपविण्याची आसुरी इच्छा यामुळे राज्याचे राजकारण केवळ गढूळच नव्हे, तर गलिच्छपणाकडे वाटचाल करू लागल्याने, सत्तेच्या साठमारीत सामान्य जनतेचा कोणी वाली असेल किंवा नाही, हा प्रश्न यापुढे दिवसेंदिवस उग्र होत जाणार आहे. कोणे एकेकाळी महाराष्ट्राच्या राजकारणास सभ्यतेची आणि आदराची परंपरा होती, असे म्हटले जात असे. राजकीय क्षेत्रातील नेत्यांचे मतभेद कितीही टोकाचे असले, तरी वैयक्तिक व्यंग्य किंवा व्यक्तिमत्त्वाच्या उणिवांची चिरफाड या राज्याच्या राजकारणाने कधीच केली नव्हती. त्या दृष्टीने महाराष्ट्र हे राजनीतीचे एक राष्ट्रीय आदर्श केंद्र होते. यशवंतराव चव्हाणांपासून ही राजकीय सभ्यतेची नीती जन्माला आली आणि अगदी कालपरवापर्यंतच्या राजकारणाने संस्कृतीचा वारसा म्हणून ती जमेल तशी जपली. याआधी राज्याच्या राजकारणात काही व्यक्तिगत संघर्षाचे प्रसंग घडले नाहीत असे नाही. १९६४ मध्ये तेव्हाचे विधानसभा अध्यक्ष बाळासाहेब भारदे यांच्या अंगावर जांबुवंतराव धोटे यांनी पेपरवेट फेकून मारला, तेव्हा त्यांची आमदारकी रद्द करून सभ्यतेच्या मर्यादा ओलांडण्याची शिक्षा त्यांना दिली गेली होती. त्यानंतर व्यक्तिगत स्वरूपातील शारीरिक हल्ल्यांची कृती किंवा उक्तीदेखील नोंदली गेलेली आढळत नाही. १९९० च्या दशकात राजकारणातील व्यक्तींच्या शुद्धीकरणाचा एक नवाच सोवळेपणा सुरू झाला होता, त्याची आजच्या तरुण पिढीला फारशी कल्पनादेखील नसेल. तेव्हा शिवसेनेत असलेल्या आणि आता महायुती सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री म्हणून सामील झालेले छगन भुजबळ यांनी मुंबईतील हुतात्मा चौकाचे शुद्धीकरण केले आणि तेव्हापासून सुरू झालेली शुद्धीकरणाची परंपरा अगदी कालपरवापर्यंत नारायण राणे यांनी शिवाजी पार्कवरील बाळासाहेबांच्या स्मृतिस्थळास वंदन केल्यानंतर ठाकरे गटाने केलेल्या शुद्धीकरणापर्यंत येऊन पोहोचली. २००३ मध्ये शिवसेनेचे नेतृत्व उद्धव ठाकरे यांच्या पदरात अलगद चालून आल्यानंतर त्या संघटनेत जी धुसफुस सुरू झाली, तेव्हापासून राज्याच्या त्या संस्कृतीने नवे रूप धारण करण्यास सुरुवात केली असावी. वांद्रे येथील रंगशारदा हॉटेलमध्ये झालेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्या विरोधात व्यक्तिगत संघर्षाचे शड्डू ठोकले. त्यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र केला आणि त्या संघर्षाला अधिक धार चढली. पण आता, अलिकडच्या काळात या संघर्षाचे हातपाय पसरले असून, उद्धव ठाकरे यांच्या कार्यशैलीचा यामध्ये मोठा वाटा मानावा लागेल. कारण अलिकडच्या काळात जे काही संघर्ष पेटले आहेत, त्यापैकी जवळपास प्रत्येक संघर्षात उद्धव ठाकरे यांचे अस्तित्व उमटलेले दिसत आहे. म्हणजे, उद्धव ठाकरे यांच्या कार्यशैलीतून हे संघर्ष सुरू होऊन फोफावले, असे मानण्यास वाव आहे. छगन भुजबळ, राज ठाकरे, गणेश नाईक, नारायण राणे आणि अगदी अलिकडे एकनाथ शिंदे व त्यांच्यासोबत शिवसेनेला सोडचिट्ठी देणाऱ्या अनेक आमदार-खासदारांनी उद्धव ठाकरे यांच्याशीच थेट संघर्ष पुकारला. तेव्हापासून राजकारणाच्या संस्कृतीचे बीभत्स रूप राज्यात उफाळून येत राहिले. २०१९ मध्ये युतीला मिळालेला सत्तास्थापनेचा जनादेश नाकारून उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या तंबूत प्रवेश करून मुख्यमंत्रिपद मिळविले, तेव्हापासून या संघर्षाने बीभत्स टोक गाठण्यास सुरुवात केली, हे गेल्या पाच वर्षांच्या इतिहासाकडे नजर टाकल्यास सहज स्पष्ट होऊ शकते. या संघर्षात शिवसेनेतील राजकारण एका बाजूला ठाकरे यांच्या विरोधात एकवटत असताना, ठाकरे यांनी मात्र, भारतीय जनता पार्टी आणि व्यक्तिगतरीत्या देवेंद्र फडणवीस यांच्यावर असभ्य टिप्पणी करत सभ्यतेच्या संकेतांना खुंटीवर टांगण्यास सुरुवात केल्याची अनेक उदाहरणे दिसतात. फडणवीस यांच्या देहयष्टीवरून केलेली असभ्य टिप्पणी, त्यांच्या नेतृत्वावर केलेली 'फडतूस' या असभ्य शब्दाची टीका येथपासून अगदी कालपरवा कुठल्याशा सभेत पायाशी टरबूज ठेवून केलेली अपरिपक्व संभावना, ढेकणाची उपमा देत मिळविलेल्या टाळ्या आणि अस्तित्वासच आव्हान देऊन केलेला अतिरेकी भावनांचा खेळ या सगळ्या बाबी महाराष्ट्राच्या त्या संस्कृतीस लाजेने तोंड लपविण्यास भाग पाडणाऱ्या ठरल्या आहेत.

एका बाजूला अशा असभ्य टीकेला आणि खोटेपणा पसरविण्याच्या एककल्ली कार्यक्रमातून सुरू झालेल्या प्रतिमाभंजनाच्या मोहिमेला संयमाने आणि संयतपणे सामोरे जात देवेंद्र फडणवीस हे राज्याच्या राजकारणाची सभ्यतेची परंपरा जपण्याचा प्रयत्न करत असताना, ज्या काही अन्य नेत्यांनी या परंपरेचा वारसा राज्यासमोर सातत्याने मांडला, ती जपण्याची आणि जोपासण्याची जबाबदारी खांद्यावर घेतली, ते नेते मात्र उद्धव ठाकरे यांच्या राजकारणातून या संस्कृतीला मिळणाऱ्या कलाटणीकडे मूकपणे पाहात आहेत, हे अधिक क्लेशदायक आणि आश्चर्यकारकही आहे. एकमेकांवर गलिच्छ आरोपांची राळ उठविणे, शिवराळ भाषेचा प्रच्छन्न वापर करणे, प्रतिस्पर्ध्यांचे अस्तित्व संपविण्याच्या धमक्या किंवा इशारे देणे असे प्रकार सुरू असताना, गेल्या अनेक दशकांपासूनच्या महाराष्ट्राच्या सभ्य संस्कृतीचे साक्षीदार असलेले, स्वतःस जाणते म्हणवून घेणारे नेते मात्र गंमत पाहात मौन धारण करून बसतात, तेव्हा त्यांच्या राजकीय हेतूविषयी शंका निर्माण होणे अपरिहार्य ठरते. एका बाजूला सामाजिक संघर्ष उफाळला आहे. आरक्षणासारख्या संवेदनशील मुद्द्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक कटुता वाढीस लागली आहे. जाती-जातींमध्ये परस्परांविरोधातील संशयाची बीजे रुजण्याची भीती बळावत आहे. धार्मिक सलोख्याच्या वातावरणात ठिणगी पडेल असे प्रसंग अचानक कोठे डोकी वर काढत आहेत आणि अशा काळात राजकारणात मात्र चिखलफेक, चारित्र्यहनन, प्रतिमाभंजन आणि सभ्यतेचे संकेत खुंटीवर टांगून जनतेलाही त्यामध्ये सहभागी करून घेण्याचा गलिच्छ डाव खेळविला जात आहे. राज्यासमोरचे प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय पक्षांमध्ये, विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये सामंजस्य असणे आवश्यक असते. कारण तशी भूमिका जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी गरजेची असते. ते दूरच राहिले, उलट, जनतेलाच समोर बसवून त्यांच्या साक्षीने आपले व्यक्तिगत हेवेदाव्यांचे हिशेब चुकते करण्याकरिता सभ्यतेची पातळी सोडून जिभा सैल सोडण्याचे घातक खेळ राज्याच्या स्वास्थ्याला रसातळाला नेऊन ठेवू शकतात, याची जाणीव या नेत्यांना वेळीच व्हायला हवी. अन्यथा, कोणी कोणास चिरडण्याच्या भाषा कराव्यात, कोणी पायाखाली टरबुजे फोडावीत किंवा कोणी कोणाचे अस्तित्व संपविण्याची आव्हाने देत जनतेला या खेळाचे साक्षीदार बनविण्याचे डाव आखले, तर सुटकेच्या प्रतीक्षेत कधीपासून ताटकळत राहिलेल्या समस्यांच्या संयमाचा विस्फोट होऊन त्याची मोठी किंमत मोजावी लागेल. उद्धव ठाकरे यांनी वा त्यांच्या गटाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिमाभंजनाचा एककलमी कार्यक्रम राबविण्याचे ठरविलेले स्पष्ट दिसत आहे. राजकारणात असे घडू शकते. पंतप्रधान मोदी यांची लोकप्रियता आणि जनमानसातील प्रतिमा हेच त्यांचे बळ असून त्यांचे प्रतिमाहनन करणे हाच काँग्रेसचा कार्यक्रम राहील, असे काही वर्षांपूर्वी जाहीर केलेल्या राहुल गांधी यांनी तो कार्यक्रम सातत्याने राबविला. आता काँग्रेसच्या सावलीत विसावलेल्या उद्धव ठाकरे यांनी त्याचा कित्ता गिरवत तसा कार्यक्रम देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी सुरू केला आहे. अशा वेळी जनतेने समंजसपणाने न्याय करायचा असतो. महाराष्ट्राची जनता तेवढी सुज्ञ निश्चितच आहे.

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# इराण कूस बदलेल?

आज सर्वोच्च नेता अयातुल्ला अली खामेनी यांच्या हाती इराणची सर्व सूत्रे आहेत, अध्यक्षाच्या हाती नाहीत. खामेनी सर्वोच्चपदी आरूढ झाले तेव्हापासून इराणचे सुरू झालेले नष्टचर्य संपायचे नाव घेत नाही. २८ जून २०२४ रोजी इराणमध्ये राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकीत सहा उमेदवार रिंगणात होते. यावेळी मुळात निवडणुकीसाठी सुमारे ८० इच्छुक उमेदवार होते; पण पडताळणी करणाऱ्या गार्डियन काऊन्सिलने फक्त सहा उमेदवारांना निवडणूक लढण्यासाठी पात्र ठरवले होते. याचा अर्थ असा होतो की, कुणाही पात्र नागरिकाला उमेदवार होण्याचे स्वातंत्र्य इराणमध्ये नाही. तरीही मसूद फेझेश्कियन या सुधारणावादी नेत्याला उभे राहण्याची अनुमती मिळते आणि तो निवडूनही येतो, हे विशेषच म्हटले पाहिजे. या निवडणुकीत मतदारांनी प्रगती आणि मानवाधिकार यांना प्राधान्य दिलेले स्पष्टपणे जाणवते. या निवडणुकीच्या पहिल्या फेरीतच सुधारणावादी उमेदवार मसूद फेझेश्कियन आणि अतिपुराणमतवादी बसीद जलिली यांच्यातच थोडीफार चुरस दिसून येत होती. मसूद फेझेश्कियन यांना १०.४ मिलियन मते किंवा ४२.४ टक्के मते मिळाली, तर बसीद जलिली यांना ९.४ मिलियन मते किंवा ३८.६ टक्के मते मिळाली. इतर सर्व आणखी खाली राहिले होते. कुणालाच ५० टक्क्यांपेक्षा जास्त मते न मिळाल्यामुळे मतदानाची दुसरी फेरी पहिल्या दोन उमेदवारांत घेण्यात आली. मतदानाच्या दुसऱ्या फेरीत मसूद फेझेश्कियन यांना माजी अध्यक्ष मोहम्मद खतामी आणि माजी मवाळ अध्यक्ष हसन रोहानी यांनी आपला पाठिंबा जाहीर केला. यामुळे सुधारणावादी मतदारांचा उत्साह वाढला आणि त्यांनी काहीशा हिरिरीने मतदान केले. पुराणमतवाद्यांजवळ साधनसामग्री भरपूर होती, पण तरीही जलिली यांना १२.८ मिलियन मतेच मिळाली तर मसूद फेझेश्कियन यांना १६.३ मिलियन मते मिळाली आणि ते विजयी झाले. एकूण मतदार संख्या ६१ मिलियन होती. फक्त ४० टक्के मतदारच मतदानात सहभागी झाले. जगभरात खुलेपणाचे वारे वाहत असताना, इराणमध्ये मात्र गेली काही वर्षे पुराणमतवादाचा पगडा वाढत चालला आहे. यामुळेही मतदारांचा निवडणुकीवरचा विश्वास फार मोठ्या प्रमाणात कमी झाला असावा, असे दिसते. इराणमध्ये खरी सत्ता सर्वोच्च नेता अयातुल्ला अली खामेनी यांच्याच हाती असते, म्हणून तर ही उदासीनता मतदारांमध्ये आली नसेल ना?

**अध्यक्षांचे मर्यादित अधिकार :** मसूद फेझेश्कियन हे इराणमधील सुधारणावादी आणि भ्रष्टाचाराचा आरोपही नसलेले नेते आहेत. त्यांनी हिजाब सक्तीचा विरोध केलेला नसला, तरी महिलांवर पोलिसांनी देखरेख (मॉरल पोलिसिंग) ठेवण्याचे बाबतीत आपला विरोध नोंदविला होता. सईद जलिली कट्टरपुराणमतवादी म्हणून कुख्यात आहेत. कुटुंबव्यवस्थेचे पावित्र्य अबाधित राहावे, ती आणखी सुदृढ व्हावी यासाठी महिलांवरील बंधने आणखी कडक केली पाहिजेत, या मताचा पुरस्कार निवडणूक प्रचार करताना जलिली हिरिरीने करीत होते. मतदान आजवरच्या तुलनेत कितीही कमी झाले असले, तरी इराणच्या जनतेने सुधारणावाद्यांना अनुकूल असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत, ही बाब लपून राहिलेली नाही. तसेच जनता हेही जाणून आहे की, मसूद फेझेश्कियन यांच्या हाती काही जादूची कांडी नाही की, जिचा वापर करून ते परिस्थितीत झटपट सुधारणा घडवून आणू शकतील. पण ते इराणच्या सध्या सुरू असलेल्या राजकीय, आर्थिक व सामाजिक घसरणीला काही प्रमाणात तरी आवर घालू शकतील, अशी जनतेची अपेक्षा आहे. अमेरिका आणि इस्रायलशी शत्रुत्व आणि हमास आणि हिजबुल्लाह या दहशतवादी चळवळींना पाठिंबा हे इराणचे परराष्ट्र धोरणाबाबतचे सूत्र राहिले आहे. आंतरराष्ट्रीय बंधनांमुळे इराणची सध्या अक्षरशः कोंडी झालेली आहे. महागाई गगनाला भिडली आहे. बेरोजगारीने कळस गाठला आहे. इराणच्या 'रिअल' या चलनाची पत डॉलरच्या तुलनेत पार रसातळाला पोहोचली आहे. इराणमधील महिला वर्ग हिजाबादी बंधनांच्या सक्तीमुळे दडपला गेला असून प्रस्थापितांविरुद्ध चिडून नुसता धुमसतो आहे. मध्येच त्याचा काही ना काही कारणांमुळे स्फोट होतो आणि दडपण्याचे सर्व मार्ग स्वीकारून प्रशासन आपली मगरमिठी आणखी बळकट करून आंदोलन चिरडून टाकते, असा प्रकार इराणमध्ये घडताना दिसतो आहे.

**सहृदयी हृदयचिकित्सक :** मसूद फेझेश्कियन हे व्यवसायाने हृदय शल्यचिकित्सक आहेत. त्यांचे सार्वजनिक चारित्र्य उत्तम असल्यामुळे त्यांचा जनमतावर प्रभाव आहे. त्यांना अमेरिकेबरोबर इराणने घेतलेली संघर्षाची भूमिका मान्य नाही. युरोप आणि अमेरिकेबरोबरचा संघर्ष इराणने थांबवावा आणि कोंडीतून बाहेर पडावे, असे त्यांचे स्पष्ट मत आहे. इस्रायलशी सुरू असलेल्या वैराला आवर घालण्याबाबत मात्र मसूद फेझेश्कियन यांनी मतप्रदर्शन केलेले नाही. अमेरिकेबरोबरच्या न्यूक्लिअर कराराचे पुनरुज्जीवन करावे या मताचे मसूद फेझेश्कियन आहेत. म्हणजेच इराणने आपल्या अण्वस्त्र निर्मितीच्या भूमिकेवर पुनर्विचार करावा, हा मुद्दा ओघानेच पुढे येणार आहे. अमेरिकेच्या विरोधामुळे भारताने इराणकडून खनिज तेल घेणे थांबवले आहे. सध्या इराण खनिज तेलाची निर्यात प्रामुख्याने चीनला करतो आहे. इराण व अमेरिकेत सख्य निर्माण झाले तर ते भारताच्या फायद्याचेच ठरेल. पण अमेरिकेत ट्रम्प यांची अध्यक्षपदी निवड झाली तर सगळीच समीकरणे बदलतील. कारण ट्रम्प इराणशी दोस्ती करण्याची सुतराम शक्यता नाही. निवडणूक प्रचार करताना मसूद फेझेश्कियनही महिलांबाबतची भूमिका निर्भीडपणे मांडत असत. इराणमध्ये आंदोलनकारी महिलांना सरळ मार्गावर आणण्यासाठी पोलिसांना दिलेले अमाप अधिकार त्यांना सपशेल अमान्य आहेत. महसा अमिनीच्या अत्यंत निर्दयपणे झालेल्या हत्येनंतर तर ते पोलिसांचे दमनचक्र थांबलेच पाहिजे, या भूमिकेवर ठाम आहेत. महिलांना बरोबरीची भूमिका द्यावी त्यांना राष्ट्रोत्थानाच्या कार्यात सहभागी करून घ्यावे तसेच कुर्द आणि बलूच या वांशिक अल्पसंख्यकांनाही कोणताही भेदभाव न करता शासन-प्रशासनात सहभागी करून घ्यावे, ही त्यांची सर्वश्रुत भूमिका आहे.

इराणमध्ये अंतिम सत्ता सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हाती आहे. त्यामुळे आपली महिलांबाबतची भूमिका मसूद फेझेश्कियन पुढे रेटू शकण्यात किती यशस्वी होतील, हा प्रश्नच आहे. पण सर्वाधिकार नसले तरी ते इराणमध्ये दुसऱ्या क्रमांकाचे नेते नक्कीच असणार आहेत. देशांतर्गत आणि परराष्ट्र व्यवहारासंबंधात ते बरेच सुधार घडवून आणू शकतील, अशी जगाचीही त्यांच्यापासून अपेक्षा आहे. पण आपल्यावर बरखास्तीची कुऱ्हाड कोसळणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतच त्यांना इराणमध्ये कारभार करावा लागणार आहे. या कसोटीला ते कितपत उतरतात ते भविष्यवेत्तेही आज सांगू शकणार नाहीत.

**कुणाला किती व कोणते अधिकार :** इराणमध्ये सर्वोच्च नेता आणि अध्यक्ष यांच्यातील अधिकारांची विभागणी ही अशी आहे. १) आर्थिक धोरण निश्चित करणे हा अधिकार अध्यक्षाकडे आहे तर पोलिस दलावर त्यांना अंतिम अधिकार नसतील. हे अधिकार सर्वोच्च नेत्याकडे असतील. २) सेनादल आणि सैन्य दलाच्या पायाभूत विचारसरणी शाखेवर म्हणजे इस्लामिक रेव्होल्युशनरी गार्डबाबत अध्यक्षांना कोणतेही अधिकार नसतील. याबाबत सर्वाधिकार सर्वोच्च नेत्याकडेच असतील. ३) सर्वोच्च नेत्याने आखून दिलेली धोरणे अंमलात आणण्याची जबाबदारी अध्यक्षांची असेल. थोडक्यात, अध्यक्षाची भूमिका सांगकाम्याची असेल तर कामसांग्याची भूमिका सर्वोच्च नेत्याची असेल. असा असतो इराणचा अध्यक्ष!

९४२२८०४४३०

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# उदर भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म!

आजच्या आधुनिक युगामध्ये पारंपरिक सुग्रास पक्वान्नाची जागा फास्ट फूडने घेतली आहे. या फास्ट फूडपायी लहान मुले अक्षरशः वेडी झाली आहेत. पिझ्झा, बर्गर, नूडल्स, मोमोझ, केक, पेस्ट्री यांसारखे पदार्थ मुलांची प्रथम पसंती असते. त्यामुळे एकेकाळी भाजी, पोळी, वरण, भात यासारख्या पारंपरिक पदार्थांनी अडगळीत आपले स्थान निर्माण केले आहे. नैसर्गिक पदार्थांवर प्रक्रिया करून निर्माण होणारे पदार्थ शरीरासाठी अतिशय हानिकारक असतात. तरीही या फास्ट फूडचा मोह आवरता आवरता आवरला जात नाही. त्यामुळे मानवाचे शरीर अनेक दुर्लभ रोगांचे माहेरघर झाले आहे. हे पदार्थ चव आणि खाण्यासाठी सोयीचे असल्याने फास्ट फूड खाण्याचे प्रमाण दरदिवशी वाढत आहे. अशा या प्रक्रिया केलेल्या अन्नामध्ये साखर, चरबी, कॅलरीज व मिठाचे प्रमाण अतिशय जास्त असते. या उलट शरीरास लागणारे पोषक द्रव्ये त्यामध्ये कमी प्रमाणात असतात. असे हे प्रक्रिया केलेले पदार्थ शरीरासाठी घातक असून, शरीराच्या अनेक भागांवर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. फास्ट फूडमध्ये मोनोसोडियम ग्लुटामेट फार अधिक प्रमाणामध्ये वापरले जाते. त्यामुळे डोकेदुखीचा त्रास होण्याची शक्यता वाढते. फास्ट फूडमध्ये ट्रान्सफॅटचे प्रमाणही अधिक असते; जे शरीरासाठी नुकसानकारक असते. जास्त साखर, चरबी व अतिरिक्त मिठामुळे फास्ट फूड अधिक चवदार बनतात. या तीन पदार्थांमुळे हृदयावर त्याचा गंभीर परिणाम होऊन लोक आजारी पडतात. फास्ट फूडबाबत जगातील अनेक देशांमध्ये संशोधन झाले असून, त्याचा निष्कर्ष भयावह असा आहे. या जंक फूडमधील ट्रान्सफॅटमुळे रक्तामधील वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी वाढून चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते. त्यामुळे टाईप-२ या प्रकारातील मधुमेह हा आजार



बळावण्याचा धोका अधिक संभवतो आणि हृदयविकाराचा धोकाही अधिक वाढतो. आपल्या आहारामध्ये मिठाचे प्रमाण वाढल्यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रासही होण्याचा धोका अधिक संभवतो. जंक फूडमध्ये कॅलरीजचे प्रमाण अधिक असल्याने लठ्ठपणा होण्याचा धोकाही अधिक असतो. लठ्ठपणा वाढला की, अस्थमा आणि श्वसनासंबंधी इतर अनेक आजार होण्याचा धोका वाढतो. असे हे प्रक्रिया केलेले जंक फूड खाऊन काही काळासाठी भूक भागत असली, तरी त्याचे होणारे दुष्परिणाम आम्ही कधीच विचारात घेत नाही. ज्या व्यक्तींना फास्ट फूड खाण्याची सवय आहे, अशा व्यक्तींना नैराश्याने बाधित होण्याची शक्यता ५१ टक्के अधिक असते. तर, दुसरीकडे शरीरातील हार्मोन्सवर त्याचा गंभीर परिणाम होऊन प्रजनन क्षमतेवरही त्याचे विपरीत परिणाम होत असल्याचा निष्कर्ष अभ्यासकांनी वर्तविला आहे. फास्ट फूड खाऊन होणारा मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा यांसारख्या आजारांचे प्रमाण सामान्यामध्ये वाढताना दिसत असले, तरी हे आजार होण्याचे वयही मागील दोन दशकामध्ये वयाच्या २५ ते ३० वर्षे एवढे खाली आले आहे. फास्ट फूड तयार करताना ते अधिक काळ टिकावे व पदार्थ ताजे दिसावे यासाठी त्यामध्ये रसायनांची भरमार असते. मनुष्याला या सर्व बाबीची कल्पना असूनही त्याकडे पूर्णपणे डोळेझाक करून त्याची दिनचर्या रासायनिक होत चालली आहे, ही दुर्दैवाची बाब आहे. 'उदर भरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म' हा श्लोक आम्ही पूर्णपणे विसरलो अन् आयुष्याच्या राखरांगोळीकडे आमची वाटचाल सुरू झाली. आधुनिकतेच्या हव्यासापायी आमच्या अनमोल अशा आयुर्वेदालाही आम्ही अडगळीत टाकले. १०० वर्षं निरोगी जगण्याची कला शिकविणारे आणि आजारच होऊ नये यासाठी दिनचर्येपासून तर ऋतूनुसार खानपानाची शास्त्रोक्त पद्धती त्यामध्ये विशद केली आहे. मुळात आजाराने शरीरामध्ये घरच करू नये हे आयुर्वेद शिकवितो. परंतु हल्ली आधुनिकतेने आम्ही बरबटलो असल्याने आयुर्वेद आम्हास हीन वाटू लागले आहे. फास्ट फूडचे सर्वाधिक गंभीर परिणाम अमेरिकेमध्ये दिसू लागले आहेत. लठ्ठपणाच्या आजारापायी त्रस्त असलेल्या लोकांपायी तेथील शासनही हतबल झाले आहे. परंतु, आम्ही अजूनही सीमारेषा ओलांडली नाही. वेळीच सावध झालो तर हा धोका आम्ही परतवू शकतो.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# बेरोजगारी : कारण, राजकारण आणि निराकरण!

यंदाच्या लोकसभा निवडणुकीचा प्रचार आणि निवडणुकीचे परिणाम या दोन्हींवर देशांतर्गत बेरोजगारीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून आला. निवडणूक प्रचारकाळात देशातील घटत्या रोजगार संधी, मर्यादित संख्येतील उद्योग व परिणामी वाढती बेरोजगारांची संख्या या मुद्यांवर विरोधी पक्षांनी सत्तारूढ पक्षाला घेरले; त्याचवेळी सत्तारूढ भाजपाने रोजगारवाढीच्या संदर्भात केलेले प्रयत्न व त्याचे देशातील रोजगार-स्वयंरोजगाराच्या संदर्भात केलेले १० वर्षांतील प्रयत्न, त्याचे विविध स्तरांवर झालेले फायदे सातत्याने जनतेसमोर मांडले. निवडणूक प्रचार संपून रालोआचे सरकार पुन्हा व सलग तिसऱ्यांदा सत्तेवर आले, तरी उभयपक्षी देशातील बेरोजगारीची आपापल्यापरीने चर्चा सुरूच आहे.

बेरोजगारी व बेरोजगारांच्या जिव्हाळ्याच्या मुद्याला यावेळच्या केंद्रीय अर्थसंकल्पात महत्त्वाचा व मध्यवर्ती मुद्दा बनविण्यात आला आणि यातच बेरोजगारीच्या मुद्याचे कायमस्वरूपी महत्त्व स्पष्ट होते. निवडणूकपूर्व व निवडणूक निकालानंतरही देशातील बेरोजगारी या सामाजिक-आर्थिक विषयाशी निगडित चर्चेला राजकीय स्वरूप मिळणे अपरिहार्य होते. याचे मोठे व महत्त्वाचे कारण म्हणजे, बेरोजगारांच्या वाढत्या संख्येप्रमाणेच देशातील मोठ्या प्रमाणावर असणारी युवकांची, म्हणजेच युवा मतदारांची मोठी व वाढती संख्या. त्यामुळेच निवडणूक संपली, तरी प्रचारातील बेरोजगारी या मुद्यांचे कवित्व मात्र अद्याप कायमच आहे.

सकृतदर्शनी पाहता बेरोजगारीची समस्या ही राजकारणाच्या पलीकडची आहे. उद्योग-व्यवसाय व त्याद्वारे रोजगारसंधी उपलब्ध करून देणे ही राज्य व केंद्र या उभय सरकारांची जबाबदारी ठरते. अगदी संवैधानिक स्वरूपात उद्योग हा विषय संयुक्त सूचीत म्हणजेच केंद्र व राज्य या उभय सरकारांच्या अखत्यारीत ठेवण्यात आला. प्रत्यक्षात मोठ्या संख्येने रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या मोठ्या उद्योगांना केंद्र सरकारतर्फे धोरणात्मक स्वरूपात सहकार्य केले जाते; प्रत्यक्षात या उद्योगांची स्थापना संबंधित उद्योगाच्या व्यावसायिक गरजा व उपलब्ध सुविधांनुरूप त्या त्या राज्यात उद्योग सुरू होतात. परिणामी, नोकरी-रोजगार वा स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

त्यामुळे विशेषतः निवडणूक प्रचारकाळात तद्दन राजकीय दृष्टिकोनातून देशातील बेरोजगारीला केवळ केंद्रातील भाजपा सरकारलाच जबाबदार धरणे, हा राजकारण वा निवडणूक प्रचाराचा मुद्दा भलेही राहो; मात्र प्रत्यक्ष ते एक अर्धसत्य ठरते. याचेच प्रत्यंतर आले ते म्हणजे, निवडणूक प्रचार वा त्यानंतरच्या काळात नरेंद्र मोदी त्यांचे सहकारी व भाजपातर्फे देशातील उपलब्ध रोजगार व स्वयंरोजगाराच्या संदर्भात होणारी देशपातळीवर व सार्वत्रिक स्वरूपातील वाढ अधोरेखित करीत होते. त्याचवेळी विरोधी पक्ष सोयीस्करपणे संपूर्ण देशातील बेरोजगारीला केवळ भाजपा व केंद्र सरकारलाच जबाबदार ठरवत होते. अर्थात, त्यादरम्यान विरोधी पक्ष एक बाब राजकीयदृष्ट्या विसरले होते की, आजही देशात बऱ्याच राज्यांत गैरभाजपा वा विरोधी पक्षांचे शासन आहे. परिणामी आपापल्या राज्यात उद्योग-विकास व त्याद्वारा नोकरी व रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य सरकार म्हणून या राज्य सरकारांची आहे. याचेच विशेष प्रत्यंतर तेव्हा आले, जेव्हा राहुल गांधी यांनी गुजरातमध्ये एका ठिकाणी नोकरीच्या मुलाखतीसाठी मोठ्या संख्येने जमलेल्या उमेदवारांचा व्हिडीओ शेअर केला. त्यावरून सध्या सर्वाधिक बेरोजगारी भाजपाशासित राज्यांमध्ये असल्याचे जाहीर राजकीय विधान त्यांनी केले. राहुल गांधी यांनी बेरोजगारीला महामारी तर म्हटले; मात्र बेरोजगारीची ही कथित महामारी विरोधी पक्षशासित नव्हे, तर प्रामुख्याने भाजपाच्या सरकारांच्या राज्यातच अस्तित्वात आहे, अशी टीका केली. अशा प्रकारचे राजकीय आकलन व संभाषण निवडणूक प्रचारात चालत असले, तरी सत्यापासून ते कोसो दूरच म्हणावे लागेल. निवडणूक प्रचारादरम्यान राजकीय अभिनिवेशापोटी बेरोजगारीच्या संदर्भात गोरखपूर येथील एका युवकाच्या आत्महत्येच्या घटनेचा पुरेपूर उपयोग विरोधी पक्षांनी करून घेतला. गोरखपूर हा उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा परंपरागत मतदारसंघ असून उत्तरप्रदेशात भाजपाची सत्ता आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय. या पृष्ठभूमीवर गोरखपूरच्या त्या युवकाने बेकारीमुळे आत्महत्या केली, असा मोठा राजकीय गाजावाजा करण्यात आला. प्रत्यक्षात या तरुणाने कौटुंबिक कारणे व नैराश्यापोटी आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले. मात्र, तोपर्यंत लोकसभा निवडणूक होऊन गेली होती.

राहुल गांधी व त्यांच्या समर्थकांना देशातील बेरोजगारवाढीच्या संदर्भातील खोट्या आरोपांना व प्रचाराला यापूर्वी भाजपातर्फे आपल्या प्रचारयंत्रणेद्वारा उत्तर दिले जात होते. आता मात्र भाजपातर्फे प्रचलित व अद्ययावत तथ्य आणि आकडेवारीसह हे प्रत्युत्तर दिले जात आहे. यासंदर्भातील ताज्या आकडेवारीनुसार स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नव्यानेच प्रकाशित केलेल्या अभ्यास व आकडेवारीनुसार, काँग्रेसच्या डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारच्या तुलनेत गेल्या १० वर्षांत मोदी सरकारने अधिक रोजगारसंधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

भारतातील बेरोजगार आणि बेरोजगारीच्या या प्रचारतंत्रात विदेशी प्रचारसंस्था मोठ्या हिरिरीने सामील झाल्याचे आता स्पष्ट झाले आहे. निवडणूक काळात या संस्था अधिक सक्रिय झाल्या होत्या. प्रत्यक्षात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नुकत्याच प्रकाशित केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या आर्थिक वर्षात उपलब्ध झालेल्या रोजगारसंधींमध्ये ४.६७ कोटींची भर पडली आहे. रिझर्व्ह बँकेच्या याच अहवालानुसार, गेल्या वर्षीपर्यंत देशातील रोजगारांमुळे कामकरी-नोकरदारांची संख्या ६४ कोटी झाली आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, त्यापूर्वी देशांतर्गत रोजगारांची नोंदणीकृत संख्या होती ६० कोटी. याचाच अर्थ, गेल्या एका वर्षात चार कोटींहून अधिक नोकरी-रोजगारसंधी देशांतर्गत तरुण व युवावर्गाला उपलब्ध झाल्या आहेत. नव्यानेच संसदेत सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात कौशल्य विकासाला मोठी गती देण्यात आली आहे. आधीच्या पंतप्रधान विश्वकर्मा कौशल्य विकास योजना, उद्योजकता विकास योजना, स्वयंरोजगारांसाठी मुद्रा वा तत्सम योजना यांच्याच जोडीला आता नव्या व व्यापक स्वरूपात इंटर्नशिप-उमेदवारी योजना, एक हजार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या विकासासह अद्ययावत बनविणे, नोकरी-रोजगार क्षेत्रात प्रथमच पदार्पण करणाऱ्या नव्या कर्मचाऱ्यांना केंद्रीय भविष्य निर्वाह निधी योजनेद्वारे १ हजार ५०० रुपयांच्या राशीचा लाभ इत्यादीमुळे कौशल्य विकासासह उमेदवारांना नोकरी-रोजगाराचा तर उद्योग-व्यवसायाला कौशल्यप्राप्त उमेदवार मिळण्याचा दुहेरी फायदा होत आहे. दरम्यान, बेरोजगारीसह नोकरी-रोजगाराच्या मुद्यांवर सरकार व सत्तारूढ पक्षाला घेरण्यासाठी विरोधी पक्ष टीका करताना काही असंबद्ध व प्रसंगी खोट्या गृहीतकांचा आधार घेत असतात. यामध्ये सोयीस्कर राजकारणाचा समावेश ठरवून व नियोजनबद्ध स्वरूपात केला जातो. निवडणूकपूर्व काळ, निवडणूक प्रचार व निकालच नव्हे, तर आता नव्या व्यावहारिक आणि रोजगार-स्वयंरोजगारप्रवण अर्थसंकल्पानंतर हाच राजकीय क्रम सुरू आहे. बेरोजगारीवर मुद्देहीन चर्चा व टीका करण्यामागे हेच निवडणूक प्रवण कारण व राजकारण आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### सत्य समोर यायला हवं!


आदरणीय राहुल सोनिया राजीव गांधीजी, सप्रेम नमस्कार विनंती विशेष!



आपण आम्हाला आमची जात विचारत आहात त्याबद्दल आमच्या मनात आपल्याविषयी कुठलाही राग नाही; उलट कुणीतरी मोठ्ठं माणूस आम्हाला आमची जात विचारतंय्, याचा आनंदच होत आहे! विनंती एकच आहे राहुलजी, आधी आपणही आपली ओळख आम्हाला सांगा ना? राहुलजी, आमच्या सनातन भारतीय परंपरेत आम्ही आधी स्वतःची ओळख करून देतो आणि मग समोरच्याची ओळख विचारतो! राहुलजी, आमच्या भारतीय सनातनी परंपरेत अपत्याची जात ही त्याच्या जन्मदात्या पित्याच्या जातीवरून ठरत असते! जी जात पित्याची, तीच जात अपत्याची! आपोआप! म्हणून, राजीव गांधी यांची जी जात असेल तीच जात राहुल गांधी यांचीही असली पाहिजे! राजीव गांधी यांचे पिताश्री फिरोज खान गांधी हे पारसी होते. त्यामुळे राजीव गांधीही पारसी आणि त्यामुळे राहुल गांधीही पारसीच आहेत/असले पाहिजेत! बरोबर ना राहुलजी? पण राहुलजी, तुम्ही हे सगळं जाहीरपणे का सांगत नाहीत? 'मी पारसी आहे' असं तुम्ही सांगितलं तर तुमच्याविषयी आमच्या मनात असलेला आदर आणखी वाढेल. कारण पारसी समुदायाविषयी सनातनी भारतीयांच्या मनात प्रचंड आदर आहे. मागे एकदा कोटावर जानवं धारण करायला लावून राहुल हे दत्तात्रेय गोत्री ब्राह्मण असल्याचे सांगितले गेले होते. मान्य, असू शकतात, पण मग तुम्ही किंवा तुमच्या पिताश्रींनी किंवा तुमचे आजोबा फिरोज गांधी यांनी 'पारसी' धर्माचा त्याग करून 'सनातन धर्म' आणि 'ब्राह्मण' जात कधी धारण केलीत ते सांगितले पाहिजे ना? 'गोत्रधारी ब्राह्मण' ही जात फक्त सनातन धर्मातच असू शकते! असं तर नाही की, आपण किंवा आपल्या पिताश्रींनी दुस~?या कुठल्या धर्माची दीक्षा घेतली होती/घेतली आहे, जिथे 'जात' अस्तित्वातच नसते? तसं असेल तर आपण तसं स्पष्टपणे सांगायला हवं राहुलजी? आम्ही सनातनी भारतीय शेकडो वर्षांपासून अन्य धर्मावलंबीयांचा मोठ्या मनाने स्वीकार करत आलो आहोत. आपण भारताचे पंतप्रधान व्हायची स्वप्नं बघत आहात राहुलजी. जरूर व्हा, पण मग आपण हा संशय दूर केला पाहिजे राहुलजी? खरं म्हणजे सत्य काय आहे ते आतापर्यंत जनतेसमोर यायला हवं होतं ना राहुलजी? धन्यवाद!

**सोमनाथ देशमाने**/९४२१६३६२९१

### आला पावसाळा; बाहेरचे खाणे टाळा



आज बहुतांश तरुणाई रस्त्यावरील फरसाणच्या ठेल्यावरील गुपचूप, समोसा, कचोरी, शेवचिवडा खाऊन आपले पोट भरीत असतात. हे ठेले गावातील, शहरातील रस्त्याला लागून असलेल्या नाल्यांवर उभारलेले असतात. यामुळे ठेल्यावरील पदार्थ हे हायजेनिक आणि सुरक्षित नसतात. श्रावण मास सुरू झाल्याने जिकडे तिकडे माश्यांचे अस्तित्व नजरेस येत आहे. यामुळे कॉलरा, पटकी, विषमज्वरसारखे आजार जोर धरू शकतात. याबाबत अन्न प्रशासनसुद्धा जागरूक नसते. एखादी घटना घडल्यानंतरच आपल्याकडे कारवाई करण्याचा प्रघात पडलेला आहे. पावसाळ्यात शिळे अन्न पदार्थ खाऊ नये. यामुळे पोटाचे विकार जडू शकतात. पावसाळ्यात पिण्याचे पाणी गढूळ होत असल्याने ते गाळून व उकळून प्यावे, असे आरोग्य विभागाकडून सांगितले जाते. याचा गांभीर्यपूर्वक विचार व्हायला हवा. तशी कृती हातून घडावयास हवी. असे होत नसल्याने दवाखान्यातील पेशंटमध्ये वाढ होताना दिसून येते आहे. या पावसाळी वातावरणाचा परिणाम लहान मुलांवर, ज्येष्ठ नागरिकांवर लवकर होत असतो. त्यांची पाचनशक्ती ही पावसाळ्यात कमजोर झालेली असते. आजकाल जो तो नोकरी करून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी धडपडतो आहे. यात स्त्रिया आघाडीवर दिसत आहेत. त्यांची आर्थिक बाजू भक्कम दिसून येते आहे. नोकरीतील स्त्री वर्गाचे प्रमाण हे वाढते आहे. परंतु त्यांना आता घर आणि मुलं एवढेच करून भागणारे नाही तर त्या आपले अधिकार गाजवू पाहात आहेत. याच कारणाने त्यांना स्वयंपाक करण्याची सवय राहिलेली नाही. ते झोमॅटोसारख्या ॲपचा वापर करून घरपोच वाटेल ते खाद्यपदार्थ मागवताहेत. याचा परिणाम स्वास्थ्यावर होतो आहे. या खाद्यपदार्थांने पोट तर भरते; परंतु ते आरोग्यविषयक समस्या निर्माण करत आहे. आज इंस्टंट फूडचा जमाना आहे. बर्गर, बटाटा पाव, समोसा, पाणीपुरी, मसाला दोसा, गोली वडापाव इ.सारखे मैदायुक्त आणि मसालेदार तेलयुक्त पदार्थ खाण्याने शरीर स्वास्थ्य बिघडते आहे. या पदार्थात कुठलेही जीवनसत्त्व आढळून येत नाही. यामुळे जीवनसत्त्वांची कमतरता जाणवते. यासाठी जीवनसत्त्वाचे इंजेक्शन घ्यावे लागते आहे. ही आजची जीवनशैली झाली आहे.

**मिलिंद गड्डमवार**/९५११२१५२००

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या थकबाकीदारांनी विविध ओ.टी.एस योजनांचा लाभ घ्यावा : डॉ.सचिन ओम्बासे

**⁕ थकबाकीदारांच्या मदतीनेच डीसीसी बँकेला मिळणार उर्जितावस्था... ⁕ थकबाकीचा भरणा करून बँकेकडुन नवीन कर्ज घेण्यासाठी होता येईल पात्र... ⁕ राज्य शासनाकडुन शेतकऱ्यांना रु.३ लाखापर्यंतचे कर्ज शुन्य टक्के व्याजदराने देण्याची सुरु आहे योजना...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट-**

उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची अनेकाकडे थकबाकी असल्याने बँक आर्थिक अडचणीतून मार्गक्रमण करीत आहे.बँकेस अडचणीतून बाहेर काढून उर्जितावस्था प्राप्त करण्यासाठी शासनाने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती नेमली आहे.समिती माध्यमातून विविध ओ.टी.एस योजना आखण्यात आल्या आहेत. या योजनांचा सर्व थकबाकीदारांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी केले.

बँकेस उर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी राज्य शासनाने जिल्हाधिकारी,धाराशिव यांचे अध्यक्षतेखाली सहा सदस्यांची संनियंत्रण समिती गठित केलेली आहे. या समितीची पहिली बैठक १९ जुलै रोजी संपन्न झाली.समिती सदस्यांकडुन बँकेच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यात आला. बँकेची वाढलेली थकबाकी हे एक प्रमुख कारण बँक अडचणीत येण्यामागचे आहे.समितीने बँकेच्या आर्थिक बाजुचा



विचार करून बँकेने थकबाकी वसुलीसाठी वेगवेगळ्या ओ.टी.एस.योजना अंमलात आणण्यासाठी सुचना करण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने जिल्ह्यातील सर्व थकबाकीदारांना बँकेने तयार केलेल्या विविध ओ.टी.एस.योजनांचा लाभ घ्यावा. तसेच थकबाकीचा भरणा करून बँकेकडुन नवीन कर्ज घेण्यासाठी पात्र होत येईल.

राज्य शासनाकडुन शेतकऱ्यांना रु.३ लाखापर्यंतचे कर्ज शुन्य टक्के व्याजदराने देण्याच्या सुचना आहेत. याचा लाभ सर्व शेतकऱ्यांनी घ्यावा.

तसेच बिगरशेती कर्ज प्रकारातील ज्या संस्थांकडे बँकेची थकबाकी येणे आहे, अशा सर्व संस्थांच्या पदाधिकारी, अवसायक इत्यादींनी तातडीने थकबाकी भरणा करण्यासंबंधी योग्य ती कार्यवाही करावी, यामुळे बँकेच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होण्यास मदत होणार आहे. परिणामी या बँकेच्या सामान्य ठेवीदारांना त्यांच्या जमा असलेल्या ठेवी गरजेच्या वेळी उपलब्ध करून देऊन बँकेवरील ठेवीदारांचा विश्वास कायम राखण्यास मदत होणार आहे. तसेच जिल्ह्याच्या सहकारातील शिखर संस्थेस उर्जितावस्था प्राप्त झाल्याने जिल्ह्यातील सहकारी चळवळीस नव्याने उभारी मिळेल. सहकारी चळवळ अधिक बळकट होण्यास मदत होईल. तरी सर्व थकबाकीदार सभासदांनी/संस्थांनी आपल्याकडील थकीत रक्कमेचा संलग्न शाखेत भरणा करून नवीन कर्ज उचलण्यास पात्र व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.संनियंत्रण समितीचे अध्यक्ष डॉ.सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती साजरी

**वाशी, दि.५ ऑगस्ट -**

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती साठे नगर वाशी येथे साजरी करण्यात आली. यामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष नगरपंचायतच्या विजया गायकवाड होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना नेते प्रशांत चेडे, उपनगराध्यक्ष सुरेश कवडे, विकास पवार, महादेव क्षीरसागर, नवनाथ क्षीरसागर, दिलीप क्षीरसागर उपस्थित होते. यावेळी पोलीस निरीक्षक अशोक सावंत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर मान्यवराच्या हस्ते प्रतिमेची पूजन करण्यात आले. यानंतर प्रस्ताविक अजय शिरसागर यांनी केले. सुरेश कवडे प्रशांत चेडे, रवींद्र बागुल रामभाऊ लगाडे यांची भाषणे झाली. यावेळी दीडशे ते दोनशे महिला-पुरुष सहभागी झाले होते.

### श्रावण मासारंभास गावोगावी राम कथा वाचन व निरुपनास सुरुवात

**इटकळ, दि.६ ऑगस्ट -**

तुळजापुर तालुक्यातील तब्बल १४ गावात पोथी पुराण ग्रंथ वाचन निरूपणास मोठया उत्साहात प्रारंभ झाला. माणसाला माणसा प्रमाणे वागण्याचे ज्ञान हे केवळ राम कथा श्रवणातूनच मिळते हा उद्देश बाळगून श्रावण मासारंभाच्या पहिल्याच दिवशी सोमवार दि.५ ऑगस्ट रोजी अणदूर खंडोबा मंदिर, अणदूर वत्सलानगर हनुमान मंदिर, इटकळ श्रीराम मंदिर, उमरगा चि. हनुमान मंदिर, येवती हनुमान मंदिर, हिप्परगा ताड हनुमान मंदिर, धनगरवाडी हनुमान मंदिर, मानेवाडी हनुमान मंदिर, केरूर हनुमान मंदिर, बाभळगाव हनुमान मंदिर, खानापुर हनुमान मंदिर, तांदुळवाडी नागोबा मंदिर, चव्हाणवाडी (धनगरवाडी), तीर्थ बुद्रुक हनुमान मंदिर आदी गावात श्री भावार्थ रामायण ग्रंथ, श्री पांडवप्रताप ग्रंथ, श्री रामविजय ग्रंथ, श्री हरिविजय ग्रंथ, श्री भक्तिविजय ग्रंथ वाचन व निरुपनास सुरूवात करण्यात आलेली आहे. तरी सर्वच राम भक्तांनी आप आपल्या गावात राम कथेचा लाभ घ्यावा राम भक्तीचा ओलावा असाच आपल्या अंगी निरंतर असु द्यावा समस्त रामभक्त ग्रामस्थांचे आस्था भावार्थ रामायण ग्रुपच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. प्रत्येक गावात राम कथेस रामभक्त ग्रामस्थांचा मोठया प्रमाणात प्रतिसाद दिसुन येत आहे.





### सोपान कनेरकर यांचे व्याख्यान संपन्न

**तुळजापूर, दि.६ ऑगस्ट -**

तुळजापूर येथील समर्थ नागरी सहकारी पतसंस्थचे संस्थापक चेअरमन तथा जिल्हा मजूर फेडरेशनचे चेअरमन नारायण नन्नवरे यांच्या वाढदिवसानिमित्त समर्थ परिवार व फिनिक्स फाऊंडेशन यांच्या वतीने महाराष्ट्राचे युवा व्याख्याते सोपान कनेरकर यांचे व्याख्यान तुळजापूर येथील शिवपार्वती मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी डॉ. आनंद मुळे, संस्थेचे चेअरमन नारायण नन्नवरे, व्हा. चेअरमन श्रीकांत भोजने, सचिव सज्जन जाधव, संचालक शिवाजी गायकवाड, संजय व्हटकर, राजेंद्र माळी, रवींद्र ताटे, संतोष इंगळे, पंकज अग्रवाल यांच्यासह फिनिक्स फाऊंडेशनचे अजिंक्य नन्नवरे, प्रसास पानपुडे, अरुण पवार, ऋषी पाटील, पांडुरंग महाराज रेड्डी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभिजित म्हेत्रे, सुनील शेरेकर, अश्विनी तांबे, तानाजी फुलसुंदर, भागवत गुंड, जावेद शेख, अशपाक सय्यद, श्रीनिवास मुळे, मधुकर साळवे, गणेश ठेले, सचिन मोरे यांनी परिश्रम घेतले.



### जयंतीनिमित्त गरजू विद्यार्थ्यास वह्या, दप्तर साहित्य वाटप

**भूम, दि.६ ऑगस्ट -**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त सौ राणी ताराराजा प्रशालेत वह्या, दप्तर गरजू मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यास वाटप करण्यात आले. यावेळी इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनी स्वरा प्रदीप गवळी हिने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे जीवन चरित्र अतिशय उत्तम प्रकारे सादरीकरण केले. या कार्यक्रमास अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जंयती उत्सव कमिटी अध्यक्ष प्रदीप साठे, अण्णाभाऊ साठे युवा मंच अध्यक्ष गणेश साठे, कोषाध्यक्ष किरण साठे, सचिव सचिन साठे, विशाल साठे, चंद्रशेखर देशमुख, मुख्याध्यापिका शामल तांबारे, मुख्याध्यापक अमोल पुरंदरे, प्रमोद बाकलीकर, संतोष कुलकर्णी, परमेश्वर धुमाळ, निलेश लोखंडे, अनिरुद्ध ऊनवणे, शितल राऊत, पूजा भारती आदि उपस्थित होते. या कार्यक्रमात एकूण ५० गरजू विद्यार्थ्यास प्रत्येकी दोन वह्या, एक दप्तर देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद बाकलीकर यांनी केले.

### मालमत्तेविरुध्द गुन्हे

**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

भुम शहरातील मारुती मंदीरासमोर लावलेले सुमंत रामेश्वर जाधवर, वय ३८ वर्षे, रा. तांबेवाडी ता. भुम जि. धाराशिव यांची अंदाजे ३५ हजार रुपये किंमतीची होंडा शाईन कंपनीची काळ्या रंगाची मोटरसायकल क्र एमएच २५ एए २७२३ ही दि.२५ जुलै रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला.

## विशेष संक्षिप्त पुर्नरीक्षण मतदान याद्यावर दावे, हरकती स्वीकारण्यास सुरुवात

**धाराशिव, दि.६ ऑगस्ट-**

भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निर्देशानुसार छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष पुर्नरीक्षण कार्यक्रम घोषीत करण्यात आला होता. यानुसार ६ ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार यादी सर्व मतदान केंद्र, तहसिल कार्यालय,उपविभागीय अधिकारी कार्यालय तसेच सर्व पदनिर्देशित ठिकाणी प्रसिध्द करण्यात आली आहे.

मतदार यादीवर आता दावे हरकती स्विकारण्यास सुरुवात झाली आहे. २० ऑगस्टपर्यंत दावे व हरकती स्विकारण्यात येणार आहेत. यामध्ये नागरिकांकडून मतदार नोंदणीचे, मतदार यादीमधील दुरुस्ती तसेच नाव वगळणीचे अर्ज मागविण्यात येत आहेत. याच कालावधीमध्ये मुख्य निवडणूक अधिकारी यांनी निश्चित केलेले दोन शनिवार व रविवार या दिवशी विशेष मोहिमांचा कालावधी असणार आहे. २९ ऑगस्ट रोजी दावे, हरकती निकालात काढणे, अंतिम प्रसिध्दीस आयोगाची परवानगी घेणे, डाटाबेस अद्यायवत करणे आदी कार्यक्रम असणार आहे. यानंतर ३० ऑगस्ट रोजी मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी करण्यात येणार आहे. नागरिकांनी आपले नाव मतदार यादीमध्ये नोंदवून घ्यावे. त्याबरोबरचे मतदार यादीत नाव असल्याची खात्री करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सचिन ओंम्बांसे यांनी केले आहे.

## प्रा.वेदकुमार वेदालंकार यांना जीवनसाधना पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट-**



डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने धाराशिव उपपरिसरासाठी देण्यात येणारा जीवन साधना पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. प्रख्यात साहित्यिक तथा शिक्षणतज्ञ प्रा.वेदकुमार रघूत्तमदास वेदालंकार यांना यंदाचा हा पुरस्कार घोषित करण्यात आला आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांनी दिली.

विद्यापीठाच्या वतीने गठीत करण्यात आलेल्या समितीने सदर निवड केली आहे. शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते येत्या १६ ऑगस्ट रोजी विसाव्या वर्धापनदिनी पुरस्कार वितरण करण्यात येईल.

कुलगुरू डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ उपपरिसरच्या सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे.

# स्वातंत्र्यदिनी श्रीपतराव भोसले हायस्कुलचे माजी विद्यार्थी जन आंदोलनाच्या तयारीत...

**जिल्हाधिकारी कार्यालयातून गुरुवर्य के.टी. पाटील यांचा पूर्णाकृती पुतळा निष्कासित प्रकरण**

**धाराशिव, दि.६ ऑगस्ट-**

जिल्हाधिकारी यांनी मुख्याधिकारी नगर परिषद यांना पत्राव्दारे गुरुवर्य के. टी.पाटील यांचा पूर्णाकृती पुतळा काढणे बाबत आदेशित केलेले आहे. त्या संदर्भात गुरूवर्य के.टी पाटील स्मारक समितीच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे. सर्व पत्र व्यवहारासंदर्भात व संस्थेच्या जागे संदर्भात अभ्यास केला असता पुतळा बसवलेली जागा ही संस्थेच्या मालकीची असून आम्ही हा पुतळा उभा करण्यासाठी जवळपास पंधरा ते वीस हजार आजी व माजी विद्यार्थ्यांनी वर्गणीतून गुरुवर्य के.टी. पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण केलेले आहे. यामुळे सदरील पुतळा हटविणे बाबत केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात धाराशिवकरांच्या वतीने व १० ते १५ हजार आजी माजी विद्यार्थी व कर्मचारी यांच्या वतीने जन आंदोलन तयारीत असून पुतळा उभा करण्याचे त्यांचे स्वप्नाचा भंग होणार असल्याचे दिसत आहे.

श्रीपतराव भोसले हायस्कूल या प्रशालेची जागा ही सन १९६१ पासून संस्थेच्या शैक्षणिक प्रयोजना अंतर्गत संस्थेच्या ताब्यात आहे. यासंदर्भात सन २०१२ साली तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ.प्रवीण गेडाम यांच्या कार्यकाळात जमिनीचा वाद निर्माण झालेला होता. यासंदर्भात संस्थेने किती रक्कम भरावयाची याबाबत आठ स्मरणपत्र सन २०१४, २०१५, २०१६, २०१७, २०१८ २०१९ या कालावधीमध्ये जिल्हाधिकारी, धाराशिव यांना संस्थेने दिलेली आहेत. तरीही अद्याप पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयातून किती रक्कम भरावयाची यासंदर्भात संस्थेला कसलीही माहिती मिळालेलो नाही त्यामुळे संस्था जमीन नियमानुकुलीत करण्यासाठीची रक्कम भरू शकलेली नाही. म्हणजे एकीकडे संस्थेला २०१२ पासून जमीन नियमानुकुलीत करता येऊ नये

यासाठीचे प्रयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातून होत असून दुसरीकडे संस्थेची जागा संस्थेच्या नावाने पी.आर.कार्ड असून सुद्धा ही जागा बेकायदेशीर असल्याचे दाखवून या जागेतील गुरूवर्य के.टी पाटील सर यांच्या पुतळा हटवण्याचे षडयंत्र कोणाच्या माध्यमातून होत आहे? तसेच या जागेवर उभा असलेल्या शैक्षणिक इमारतींना न.प.मुख्याधिकारी धाराशिव यांनी बांधकाम परवाना दिलेला आहे.

सदरील बांधकाम परवाना देते वेळी न.प.मुख्याधिकारी धाराशिव यांनी जागेच्या मालकी हक्क सबंधी जागेची पडताळणी केलेली आहे. आम्ही आजी-माजी विद्यार्थी, संस्थेचे कर्मचारी तसेच गुरूवर्य के.टी. पाटील सर स्मारक समितीचे सर्व सदस्य यांच्या माध्यमातून आपणास निवेदन देऊन गुरूवर्य के.टी पाटील सर यांचा पुतळा हटवण्याच्या कार्यवाहीस विरोध करत आहोत.

सदरील कार्यवाही तात्काळ थांबवावी अन्यथा सर्व आजी माजी विद्यार्थी व कर्मचारी यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल. तसेच सदरील कार्यवाही न थांबवल्यास दि.१५ स्वातंत्र्यदिना दिवशी सर्व आजी, माजी विद्यार्थी व सर्व कर्मचारी यांच्या वतीने पुतळा परिसरामध्ये, जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव, उपविभागीय अधिकारी कार्यालय ,धाराशिव, मुख्याधिकारी न.प. धाराशिव यांच्या विरोधात आमरण उपोषण करणार आहोत.

यावेळी गुरुवर्य के.टी.पाटील स्मारक समितीचे सचिव संतोष कुलकर्णी, समितीचे सदस्य राजेंद्र जाधव, माजी विद्यार्थी प्रतिनिधी नंदकुमार नन्नवरे, प्रमोद कदम, प्रदीप गोरे उपस्थित होते.

## पुरातत्त्वच्या सहा. संचालिका जया वाहने यांची नळदुर्ग किल्ल्यास भेट

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ ऑगस्ट-**

नळदुर्ग येथील प्रचिन व ऐतिहासिक किल्लयाला पुरातत्त्व विभागाच्या संभाजीनगर येथील सहाय्यक संचालिका जया वाहने यांनी भेट देऊन किल्लयाची पाहणी केली. युनिटी मल्टीकॉन्स कंपनीने किल्लयात केलेले काम पाहुन समाधान व्यक्त केले. किल्ला पुन्हा एकदा संगोपणासाठी युनिटी मल्टीकॉन्स कंपनीला मिळावा यासाठी आपण आमच्या वरीष्ठांना याबाबत पॉझिटिव्ह अहवाल पाठविणार असल्याचे सांगितले.

महाराष्ट्र सरकारने सन २०१४ मध्ये नळदुर्गचा ऐतिहासिक किल्ला सोलापुर येथील युनिटी मल्टीकॉन्स कंपनीला दिला होता. हा करार सध्या संपुष्टात आला असल्याने सध्या हा किल्ला पुन्हा एकदा पुरातत्त्व विभागाच्या ताब्यात आला आहे. किल्ला दहा वर्षासाठी संगोपणासाठी घेतल्यानंतर युनिटी मल्टीकॉन्स कंपनीने किल्लयात पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली अतिशय चांगले काम केले आहे त्याचबरोबर किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना सर्व मुलभुत सुविधा पुरविण्याचा युनिटी माल्टीकॉन्स कंपनीने प्रामाणिकपणे प्रयत्न केले त्यामुळे गेल्या दहा वर्षांत किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत मोठी वाढ झाली होती.

## तुळजापूर विधानसभेच्या आखाड्यात अपक्ष म्हणून उतरणार : संजय घोडके

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.६ ऑगस्ट-**



आगामी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूका जस जशा जवळ येत आहेत. तस तसे राजकीय वातावरण तापत चालले आहे. तुळजापूर विधानसभेच्या ओबीसी समाजाची प्रचंड मोठी संख्या आहे. ओबीसी समाजाच्या पाठबळावर आपण तुळजापूर विधानसभेच्या आखाड्यात अपक्ष म्हणून आपण अपक्ष म्हणून निवडणूक लढवणार असल्याचे राष्ट्रीय समाज पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष ओबीसी समाजाचे नेते संजय घोडके यांनी सांगितले.

तुळजापूर विधानसभेचा निकाल धनगर समाज ठरवू शकतो. कारण तुळजापूर तालुक्यामध्ये धनगर समाजाचे ६० ते ६५ हजार मतदान आहे. परंतु आतापर्यंत धनगर समाजाला कोणत्याही पक्षाने न्याय दिला नाही.

धनगर समाजातील काही ठराविक नेते मंडळींना फक्त सरपंच, सोसायटी चेअरमन, पंचायत समिती सदस्य एवढ्यावरच बोळवण केले आहेत यांना धनगर समाजाचे मतदान चालतात. यांना धनगर समाजाचे जे महत्त्वाचे प्रश्न एसटी आरक्षण असेल ग्रामीण भागातील सभागृह मेंढपाळ बांधवांचे प्रश्न मार्गीसह विविध प्रकारचे सोईसुविधा करण्यास त्यांना वेळ नसतो. त्यामुळे धनगर समाजासह बहुजन समाजानी यावेळेस ठरवले आहे. नवीन चेहरा तुळजापूर विधानसभेमध्ये पाठविण्याचे निश्चय केले आहेत.

तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील लोकसंख्या नुसार धनगर समाजाला आतापर्यंत न्याय मिळाला नाही. त्यामुळे येणारी २०२४ ची विधानसभा निवडणूक धनगर समाजासह ओबीसी बांधवाच्या जोरावर निवडणूक लढणार असल्याचे संजय घोडके यांनी सांगितले. यावेळी जनतेने ठरवले आहेत.

बहुजन समाजातील होतकरू २४ तास ग्राऊंड लेवलला काम करणाऱ्या तरूणांना संधी देऊन सर्वसामान्य तळागाळातील गोरगरीब लोकांची सेवा करण्यासाठी तुळजापूर तालुक्यातील जनता निवडून देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. २००९ पासून आतापर्यंत विविध जनहितार्थ कामे मार्गी लावले आहेत. याहीपुढे तुमची सेवा करण्यासाठी मला एक वेळेस संधी द्यावी. अशी साद जनतेला संजय घोडके यांनी घातली आहे.

## सोयाबीन, उडीद, मुग खरेदी केंद्र चालू करा
## आ.ज्ञानराज चौगुले यांची पणन मंत्री यांच्याकडे पत्राद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.६ ऑगस्ट-**



चालू खरीप हंगामात चांगला पाऊस झाला असून सोयाबीन, उडीद, मूग यासारख्या शेतमालाचे उत्पादन मोठया प्रमाणात होण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी खाजगी बाजार समितीमध्ये सद्या सदरील धान्याचे दर खुपच कमी आहे.

शेतकऱ्यांच्या मागणीनुसार आपले शासनातर्फे केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत योजने अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पादीत सर्व कडधान्य व तेलबियांची शासकीय हमीभावाने खरेदी प्रक्रिया राबविण्यात येऊन शासकीय हमीभाव खरेदी केंद्र लवकरात लवकर चालू करण्याची मागणी उमरगा-लोहाराचे आमदार ज्ञानराज चौगुले यांनी पणन व औकाफ मंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली.

यावेळी किसन पाटील, बालाजी पोद्दार, राजेंद्र माळी यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# मैत्री दिनी मित्रांकडून मित्रास मालवाहतूक रिक्षा भेट

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ ऑगस्ट-**

एकमेका साहाय्य करु, अवघे धरू सुपंत '' या उक्ती नुसार मित्र, मैत्री, मैत्रिसंबंध या सर्वात दडलेले एक गाभरा म्हणजेच सहायता, मित्रप्रगती असेच स्तुत्य कार्य मुरूम येथील प्रतिभा निकेतन विद्यालयातील १९९६-९७ च्या वर्गमित्रांनी केले हे कौतुकास्पद, प्रेरणादायी कार्य आहे, असे कार्य समाजातील सर्व मित्रपरिवार व नागरिकांनी केल्यास सर्वत्र स्नेह वाढेल असे मत सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत भराटे यांनी व्यक्त केले.

प्रतिभा निकेतन विद्यालय, मुरूम येथील १९९६-९७ तील वर्गमित्र आनंद कोळी हा आपल्या शिक्षणानंतर आपल्या परिस्थिती नुसार रिक्षा चालवायचा पण कोरोना कालावधीत २०२१ ला त्यास कर्करोग झाला त्यावर आपल्या प्रतिकारक शक्तीने मात केले.

पण आर्थिक परिस्थिती हालक्याची असल्यामुळे कुटुंब कसे चालवावे हा प्रश्न समोर आला. तेव्हा त्याच्या त्या वर्गमित्रांनी ही बाब लक्षात येताच सर्वांनीच जवळपास २ लाख रुपये जमवून व कोळी यांना




एक मालवाहू रिक्षा घेउन जागतिक मित्रादिनाचे औचित्य साधून भेट दिले व त्यास व्यवसाय करण्यास प्रेरणा दिली.

हा रिक्षा वितरण रविवारी (ता.४ ऑगष्ट) गणेश मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक उमरगा येथे श्री कोळी यांना सुपूर्द केला.

याप्रसंगी भराटे बोलत होते. यावेळी उमरगा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रणधीर पवार, सचिव शिवप्रसाद लड्डा, उपाध्यक्ष मनेष माणिकवार, संतराम मुरजानी, मनिष सोनी, महेश आळंगे, रवी चिंचोळे, विनायक कुलकर्णी, राम बोधे, राजू मेरू, राम पाटील व आनंद कोळीचे वर्गमित्र संदीप शिंदे, लायक अली भाजीवाले, महेश वैकुंठे, खंडेराव व्हडले, राघवेंद्र सक्करगी, संजय धुमुरे, चक्रधर पाटील, कल्लेश्वर पांचाळ, जय बन्ने, धनराज बगली, मनोज स्वामी, शिवराज कुंभार, राजकुमार दुधभाते,

धोंडीबा बनसोडे, पराग कुलकर्णी, दिपक मिणीयार, राम महिंद्रकर, मल्लिनाथ चिलोबा , संजय शेंडगे सय्यद जावेद, सुभाष शिंदे, अमर भोसगे, धनराज चेंडके, संजय शेंडगे, मनीष ब्याळे, दयानंद सरसंबे, तिम्मण्णा दासे मनोज म्हेत्रे व विनोद गायकवाड यांनी विशेष मदत केली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



# शिवसंग्रामचा मुख्याधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये ठिय्या

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ ऑगस्ट**

शहरातील विविध समस्या बाबत बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी नीता अंधारे यांना शिवसंग्राम च्या वतीने आज निवेदन देण्यात येणार होते मात्र मुख्याधिकारी उपस्थित नसल्याने शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांनी महिलांनी मुख्याधिकारी यांच्या केबिनमध्येच ठीया मांडला यावेळी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते यावेळी बीड पोलिसांचे पोलिसांना बोलवण्यात आले होते मात्र कार्यकर्ते ऑफिसच्या बाहेर निघायला तयार नव्हते पोलिसांनी मुख्याधिकारी नीता आंधरे यांना नगरपालिकेत बोलून घेऊन अंदोलकांसोबत चर्चा घडवून आणली.

# साळेगाव येथे शेंद्रीय शेती जानीव जागृती व शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.६ ऑगस्ट**

तालुक्यातील साळेगाव,आनंदगाव येथे अफार्म पुणे व दिलासा सामाजीक संस्थेच्या संयुक्त विद्दमाने शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. गेली दोन वर्षापासुन दिलासा सामाजीक संस्था अफार्मच्या सहकार्याने चार गावात शेंद्रीय शेती बद्दल जानीव जागृती करत असुन हे अभियान प्रभावीपणे राबत आहे. त्यातीलच ऐक भाग शेतकरी मेळाव्याचे आयोजन करुन शेद्रीय शेती का? करायची याचे फायदे काय? आहेत ते शेतकऱ्यांना सांगत आहे. सध्या कँन्सर सारख्या रोगाचे प्रमान भंयकर वाढत आहे. या आजार वाढण्यासाठी रासायनीक खत औषध कारणीभुत ठरत असुन याला आळा घाळुन चांगले आरोग्य रहाण्यासाठी शेंद्रीय शेतीकडे जास्तीत जासत शेतकर्यानी वळले पाहीजे असा सल्ला

दिलासा सामाजीक संस्थेच्या ज्योती संबरे देत आहेत. तृणधान्य लोप पावत चालले आसुन त्याची बीयानी आपन जपली पाहीजेत ते आपल्या दैन दिन आहारात रोज वापरी पाहीजेत. या तृन धान्यामधे मोठ्या प्रमानात व्हिटामीन आसुन ते आपल्या शरीरासाठी खुप उपयुक्त आहेत.तृनधान्य बाजरी ,ज्वारी ,राळ भगर ,नाचणी या पिकाची लागवड मोठ्या प्रमानात करुन त्याचा प्रसार करावा तसेच तृणधान्या पासुन आपन विवीध पदार्थ बन ऊन ते कषे बनवायचे याची कृति व साहीत्य व पदार्थ बनवन्यासाठी शिला कुरवडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच महीलांना आपल्या घराच्या मोकळ्याजागेत आपन आपल्या कुंटुबा साठी सकस भाजीपाला विशमुक्त भाजीपाला पिकवून आपले आरोग्या चांगले रहण्यास मदत होईल या साठी भाजीपाला बीयाने किटचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी शेतकरी, शेतमजुर, ग्रामपंचायतचे संबधीत सरपंच, सदस्य,ग्रामसेवक तसेच संजय कुलकर्णी यांची उपस्थीती होती.



# पंचशीलाच्या पालनातच विश्वाची शांती आहे-भदंत धम्मशिल थेरो

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.६ ऑगस्ट**

माजलगाव शहरांमध्ये केसापुरी कॅम्प येथील बौद्धांचे तीर्थक्षेत्र असलेल्या श्रावस्ती बुद्ध विहार येथे दर रविवारी साप्ताहिक बुद्ध वंदना आयोजित केली जाते. या वेळी पूज्य भदंत धम्मशील थेरो यांची धम्मदेशना संपन्न झाली.

दर रविवारी श्रावस्ती बुद्ध विहार येथे सदधम्म सेवा संघाच्या वतीने साप्ताहिक बुद्ध वंदना व धम्मदेशनेचे आयोजन करण्यात येते.या बुद्ध वंदनाच्या त्यावेळी माजलगाव तालुक्यातील बौद्ध उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. आजच्या पूजेचे यजमान हे ज्येष्ठ केंद्रीय शिक्षिका आयु.लीलाताई ज्ञानोबा उजगरे व डॉ.चंद्रशेखर ज्ञानोबा उजगरे हे होते.

यावेळी पूज्य भदंत धम्मशील थेरो यांनी उपासिका यांना धम्मदेशना दिली. यावेळी त्यांनी सांगितले की,आपल्यातील द्वेष कपट भावना नष्ट करण्यासाठी आणि वैराची भावना शमविण्यासाठी मनुष्याला प्रेम पूर्ण मैत्री युक्त करुणामय हृदयाची गरज आहे. व तसेच आपल्या मनातील लोभ नष्ट करण्यासाठी उद्दात्त अंतकरणाची गरज असते. सेच त्याचबरोबर मानवाला पवित्र जीवन जगण्यासाठी शुद्ध चारित्र्याचे गरज आहे . आपण असत्या पासून दूर होण्यासाठी सत्य ते स्वीकारून आपले जीवन मंगलमय करू शकतो. येणे प्रमाणे जीवन जगत असताना बुद्धांनी सांगितलेल्या पवित्र पंचशीलाच्या पालनातच विश्वाची शांती आहे.असे प्रतिपादन भदंत धम्मशील थेरो यांनी केले. सध्या वर्षावास कालावधी चालू असून दर रविवारी सातत्याने बुद्ध वंदना व धम्मदेशनेचा कार्यक्रम आयोजित केला जातो आहे. तरी माजलगाव तालुक्यातील व परिसरातील बौद्ध उपासक उपाशीकांनी या पवित्र वर्षावास कालावधीमध्ये उपस्थित राहून धम्मदेश नेचा लाभ घ्यावा असे आवाहन सदधम्म सेवा संघाच्या वतीने करण्यात आले आहे.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सद्धम्म सेवा संघाचे अध्यक्ष आयु सदाशिव भालेराव यांनी केले. तर सूत्रसंचालन ड. दशरथ मकसरे यांनी केले.तर आभार सचिव जी.एन घनघाव यांनी मानले.या वेळी भगवान सातपुते पांडुरंग जाधव, एम.बी चांदमारे, सोपान उजगरे, एन.जी शिनगारे,रविकांत उघडे, सौ.विद्याताई निसर्गंध, सौ. बबीताताई सावंत,सौ. इंदुमती खळगे, आदी उपस्थित होते.

# अनिलदादा जगताप यांच्या वतीने कंकालेश्वर विद्यालयात लेखन फलकांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ ऑगस्ट**

गरजवंतांना मदतीचा हात देऊन समाजसेवेसाठी सदैव तत्पर असणारे शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या वतीने काल दि. २ ऑगस्ट रोजी दु. १२.०० वाजताच्या दरम्यान कंकालेश्वर विद्यालयात लेखन फलकांचे (व्हाईट बोर्ड) वाटप करण्यात आले.



बीडमधील दुर्गम भागात असणाऱ्या कंकालेश्वर विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना काही दिवसांपूर्वी शिवसेनेच्या वतीने अनिलदादा जगताप यांनी वह्यांचे वाटप केले होते. दरम्यान शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी शाळेला लेखन फलकांची (व्हाईट बोर्ड) आवश्यकता असल्याचे सांगितले होते. शाळेची गरज लक्षात घेऊन अनिलदादा यांनी कंकालेश्वर विद्यालयात सहा लेखन फलकांचे वाटप करून मदत केली. अनिलदादा जगताप यांच्या वतीने शिवसेनेचे बीड विधानसभा प्रमुख सुनील अनभुले, पंकज कुटे, आकाश जगताप, प्रतिक कांबळे आणि गौरव वायभट यांनी शाळेचे मुख्याध्यापक अंबादास शेकडे, संदीप जाधवर, शिवाजी जाधवर, वीरेंद्र जाधव, सुरेश पतंगे आणि राम मोराळे यांच्याकडे सहा लेखन फलक (व्हाईट बोर्ड) सुपूर्त केले. याप्रसंगी कंकालेश्वर विद्यालयातील मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांनी अनिलदादा जगताप यांचे आभार मानले.

# नागनाथ निवासी विद्यालयात एक वही एक पेन अभियान अंतर्गत शालेय साहित्य वाटप कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ ऑगस्ट**

शहरातील वडसावित्री भागात असणाऱ्या नागनाथ निवासी विद्यालयात एक वही एक पेन अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते साहित्य वाटप करण्यात आले.



महामानव, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्ताने १४ एप्रिल रोजी पत्रकार विकास वाघमारे व विकास रोडे यांच्या संकल्पनेतून बाबासाहेबांना अपेक्षित एक वही एक पेन या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानांतर्गत जमा झालेले साहित्य आज दिनांक ६ ऑगस्ट रोजी नागनाथ निवासी विद्यालयात वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार संजय खाकरे, संपादक ज्ञानोबा सुरवसे, सामाजिक कार्यकर्ते अश्विन मोगरकर, सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे, पत्रकार धनंजय आढाव, नवनाथ दाने ,पत्रकार संभाजी मुंडे ,धीरज जंगले, विष्णू मुंडे, हरिभाऊ बुरकुले, इंजिनीयर प्रशांत रोडे, विकास चोपडे, विनायक काळे, विद्याधर शिरसाठ आदी उपस्थित होते. याप्रसंगी रानबा गायकवाड, संजय ठाकरे, अनंत इंगळे, अश्विन मोगरकर, विष्णू मुंडे , नवनाथ दाणे आदींनी आपले विचार मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रानबा गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन इंगळे सर यांनी तर आभार चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमास शाळेचे माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक होळंबे, प्राथमिकचे डी.बी. मुंडे, तसेच शिक्षक संजय फड, अनंत मुंडे, नागरगोजे ,राजभोज, मोती, कराड, धेरे, हरिदास, शिरसाठ मॅडम, व खाडे मॅडम यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# गुरुने दिलेले ज्ञान हे पुढच्या पिढीला देणे हीच खरी गुरुदक्षिणा-ॲड.कल्पनाताई देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ ऑगस्ट**

भारताला गुरु-शिष्यांची पवित्र परंपरा असुन गुरूकडून मिळालेले शिक्षण पुढच्या पिढीला देणे हीच खरी गुरुदक्षिणा असुन या गुरुदक्षिणेचे महत्व संगितक्षेत्रात अधिक असल्याचे प्रतिपादन माजी नगरसेविका,सामाजीक कार्यकर्त्या ड.कल्पनाताई देशमुख यांनी केले.तुकाराम जाधव व सौ.दिपीका जाधव यांच्या सुरसंगम संगित विद्यालयाच्या वतिने गुरूपौर्णिमेच्या निमीत्ताने संगित परिक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या गुणपत्र वितरण कार्यक्रमात बोलत होत्या.

परळी शहरातील अंध कलाकार तुकाराम जाधव व सौ.दिपीका सावजी-जाधव हे दाम्पत्य सुरसंगम संगित विद्यालयाच्या माध्यमातुन संगित क्षेत्रात कार्य करत आहे.या संगित विद्यालयाच्या वतिने दरवर्षी गुरूपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.रविवार दि.४ ऑगस्ट रोजी सुर्वेश्वर मंदिर येथे पार पडलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनोहर मुंडे संध्या च्या पिढीला गुरू शिस परपरा जमन्याची फार गरज असे अध्यक्षीय भाषणात सांगितले तर प्रमुख पाहुणे म्हणुन दिव्य मराठी तालुका प्रतिनिधी धनंजय आढाव डॉ गणेश सावजी,बालाजी सावजी माजी नायब तहसीलदार भास्कर सावजी ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे, तबला वादक बबन मस्के, संतोष पंचाक्षरी,पत्रकार धिरज जंगले आदींची उपस्थिती होती.यावेळी बोलताना ड.कल्पनाताई देशमुख यांनी सुरसंगम संगित विद्यालयाने परळी शहरातील संगितक्षेत्राला नवा आयाम दिला असुन तुकाराम जाधव व दिपीका जाधव या अंध दाम्पत्याने जोपासलेल्या या कलेला डोळस समाजाने पाठबळ देण्याची गरज असल्याचे सांगितले.प्रास्ताविकात तुकाराम जाधव यांनी सुरसंगम संगित विद्यालय चालवण्यामागचा उद्देश सांगुन लहान वयात संगिताचे शिक्षण घेतले तर तो विद्यार्थी संगितक्षेत्रात परिपूर्ण होतो असे सांगुन संगित विषया च्या तीन परिक्षा झाल्यास दोन टक्के तर पाच परिक्षा झाल्यास तीन गुणा मध्ये वाढ होते.परिक्षा इयत्ता दहावी मध्ये गुणवाढीसाठी महत्वाची असल्याचे सांगितले.कार्यक्रमाचे संचलन कु. नेतल संजय शर्मा तर आभार प्रदर्शन सौ.दिपीका जाधव यांनी केले.

पंधरा विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप

या कार्यक्रमात अ.भा.गांधर्व मंडळांतर्गत घेण्यात आलेल्या गायन,वादन परिक्षेचे सुवर्णा जंगले,रियास रुद्रवार,रिध्दीमा रुद्रवाड,अतिश्री कलशेट्टे,साची तोतला,अविका तोतला,शिया तोतला,कृतिका टाक,स्वतेजा जबदे,जानवी चव्हाण,स्वरा चव्हाण प्रविण कदम,वैभवी गुळवे,शिवानी सलगरे,राधिका बजाज,कस्तुरी खोत यांना मान्यवरांच्या हस्ते गुणपत्रिका वितरण करण्यात आले.

# मुलींनी शिक्षण घेऊन स्वत: च्या पायावर उभे राहिले तरच समाजात सन्मान मिळतो-सरपंच सुशांत पवार

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ ऑगस्ट**

मुलींनी आपले शिक्षण पूर्ण करुन स्वतःच्या पायावर उभे राहिले तरच समाजात मान सन्मान मिळतो असे प्रतिपादन गर्देवाडीचे सरपंच सुशांत पवार यांनी केले. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या वेलकम कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी महाविद्यालयात ११ वीला नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास गर्देवाडीचे सरपंच तथा युवा उद्योजक सुशांत पवार, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा डॉ विनोद जगतकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर ११ वी व १२ वीच्या विद्यार्थिनींनी मनोगते व्यक्त केली. यामध्ये नेतल शर्मा, कु.मुरकुटे, कु.गायकवाड, कु. कदम तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सुशांत पवार म्हणाले की, विद्यार्थिनींनी आपले उच्च शिक्षण पूर्ण केले पाहिजे. शिक्षणाने मुलींना समाजात सन्मान मिळतो. मुलगी उच्चशिक्षित व स्वतःच्या पायावर उभी राहिली तर कुटूंबासह सर्वत्र सन्मान मिळत असतो.अनेक मुलींना शिक्षणाची संधी मिळत नाही, ज्यांना संधी मिळते त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले पाहिजे. तर प्रा डॉ विनोद जगतकर व प्रा प्रसाद देशमुख यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा फुटके यांनी तर सुत्रसंचालन अंजली धायगुडे, आभार तनूराणी गित्ते हिने मानले. यावेळी महाविद्यालयातील प्रा.विशाल पौळ, प्रा आशिलता शिंदे, प्रा विणा पारेकर, प्रा प्रविण नव्हाडे, प्रा अशोक पवार यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परळी रेल्वे कडुन होणाऱ्या जमीन अधिग्रहणासह विविध प्रश्नांवर बीड जिल्हा कॉँग्रेसच्या वतिने रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णवांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ ऑगस्ट**

परळी परभणी रेल्वे दुपदरीकरणासाठी जमीन अधिग्रहण, परळी मुंबई रेल्वे अश्या विविध प्रश्न घेऊन रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची खासदार रजनीताई पाटील काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख परळी शहर अध्यक्ष बहादूरभाई यांच्या शिष्टमंडळाने दिल्ली येथील रेल भवन येथे भेट घेऊन निवेदन दिले आहे.

रेल्वेमंत्री यांना जिल्हा काँग्रेसच्या वतीने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, परळी परभणी रेल्वे दुहेरीकरण करण्यासाठी परळी शहरातील मुख्य गाभा असलेल्या वस्त्यांचे जमीन अधिग्रहण करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने काढलेल्या राजपत्रित सूचनेने परळी येथील या वस्त्यांमध्ये गेली ५० ६० वर्षापासून वास्तव्यात असलेल्या हजारो कुटुंबांना बेघर होण्याची वेळ आली आहे त्यावर रेल्वे प्रश्न असणारी रेल्वे पटरी च्या वस्ती विरहित असलेल्या बाजूने जमीन अधिग्रहण करून रेल्वेच्या दुहेरीकरणाचे काम करावे. पूर्वी परळी ते मुंबई अशी धावणारी गाडी आता लातूर ते मुंबई अशी धावते लातूर रेल्वे स्थानकावर मुक्कामावर असते तो मुक्काम न करता ती रेल्वे पूर्वी चालू असलेली परळी मुंबई रेल्वे गाडी पूर्वत करावी, घाटनांदुर येथील रेल्वे स्टेशन



**खा.रजनीताई पाटील, राजेसाहेब देशमुख, सय्यद हानिफ उर्फ बहादुरभाई यांनी घेतली भेट**

वरून धावणाऱ्या सर्व रेल्वेना थांबा द्यावा यासह रेल्वे संबंधीत विषयावर सखोल चर्चा होऊन निवेदन देण्यात आले. चर्चेदरम्यान काँग्रेस शिस्तमंडळाने सांगितले की, रेल्वेमंत्र्यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांना तुम्ही शब्द दिला त्याच दिवशी राजपत्रित निघालेल्या नोटीसीचे पेपरच्या माध्यमातून प्रसारित करण्यात आले होते. यामुळे पुन्हा एकदा धक्का बसला आहे.

यावर रेल्वेमंत्री यांनी सांगितले की याबाबत लवकरच निर्णय घेऊ असे काँग्रेसचे मंडळाला आश्वासित केले.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना भेटलल्या शिष्टमंडळात खासदार रजनीताई पाटील बीड जिल्ह्याचे बीड जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख परळी शहराध्यक्ष बहादूरभाई, अमर शिंदे अल्पसंख्यांक शहर अध्यक्ष रसूल खान प्रवक्ते बद्दर भाई, व अबूतला इत्यादी काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी होते.

# दानवेंच्या विघ्नसंतोषी राजकारणाला पक्षातीलच कार्यकर्ते कंटाळले!

## पक्षाच्या जिल्हा अधिवेशनात स्वकीय सोडता कार्यकर्ते, पदाधिकारी आणि वरिष्ठ नेत्यांना मुद्दाहुन डावलले? | वरिष्ठांकडे याची तक्रार करणार – सुजितसिंह जोगस

**तभा वृत्तसेवा**
**जालना/सुरेश कवडे पाटील**

जालना जिल्ह्यात भाजपाचे पारडे जड असले तरी जिल्ह्यात असलेली गटबाजी यामुळे भाजपाला कधीही जिल्ह्यावर वर्चस्व ठेवता आले नाही, कारण जिल्ह्यातील भाजपाचे वरिष्ठ नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी केलेले पक्षातीलच नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसोबत विघ्नसंतोषी राजकारण, यामुळेच जिल्ह्यात भाजपाला लागलेले दुष्काळी दिवस बोलण्यास काहीच हरकत नाही. आज झालेले भाजपाचे जिल्हास्तरीय अधिवेशनातुन पुन्हा एकदा दिसून आले.




जालन्यात भाजपच्या अधिवेशनात आमदार बबनराव लोणीकर व युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांना डावलण्यात आलेय, अधिवेशन वरून आता रावसाहेब दानवे आणि बबनराव लोणीकर यांच्यातील वाद पुन्हा चव्हाट्यावर आलाय..जालना जिल्ह्यात भाजप हा प्रायव्हेट लिमिटेड पक्ष करायचं का आयोजकांना असा सवाल युवा मोर्चा प्रदेश सचिव सुजित जोगस यांनी उपस्थित केलाय, दरम्यान याची तक्रार देवेंद्र फडणीस आणि बावनकुळे यांच्याकडे करणार असल्याचे देखील जोगस आणि म्हटले आहेत. नेहमीच दानवे यांनी केलेल्या पक्षातीलच नेत्यांवर व पदाधिकाऱ्यांवर कुरघोडी राजकारणामुळे जिल्ह्यात एक दिवस असा येईल की भाजपा पुर्णपणे जिल्ह्यातुन हद्दपार होईल आणि कारणीभूत राहतील ते फक्त दानवेंनी पोसलेली बाळगुंड यात तिळमात्र शंका नाही, पक्षातील वरिष्ठांनी याकडे तात्काळ लक्ष देऊन या बाळगुंडांचा ताबडतोब बंदोबस्त करण्याची गरज आता मात्र निर्माण झाली आहे.

### दादांचा आदेश लोणीकरांचे कुठेही नाव नको– पठाडे



आज झालेल्या पक्षाच्या जिल्हास्तरीय अधिवेशनात माजीमंत्री तथा परतुर–मंठा विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर तसेच भाजयुमोचे विद्यमान प्रदेशाध्यक्ष राहुलभैय्या लोणीकर यांचा कार्यक्रम पत्रिका अथवा बॅनर किंवा त्यांना निमत्रंण असा कुठेही नामोल्लेख नसल्यामुळे आमच्या प्रतिनिधीने जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे यांच्याची संपर्ककरून विचारणा केली असता त्यांनी सांगितले रावसाहेब दादा दानवे यांचा तसा आदेश होता.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी अरविंदराव चव्हाण सरसावले; कृषीमंत्र्यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंढे यांना मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टी व पावसामुळे रब्बी हंगामातील हरभरा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्या विमाधारक शेतकर्यांचा सरसकट विमा मंजूर करण्यात यावा याबाबत चे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी आज मुंबई येथे दिले. मागील वर्षीचा हरभरा पिकाचा विमा कंपनीने मंजूर केला आहे. परंतु जे शेतकरी पिक विमा कंपनीकडे तांत्रिक अडचणीमुळे तक्रार नोंदवू शकले नाही. अशा शेतकऱ्यांना कंपनीने वाऱ्यावर सोडू नये. विमा कंपनी कडे जे शेतकरी तक्रार नोंद करू शकले नाही त्यांचे ही नुकसान झालेले असून अशा शेतकऱ्यांसोबत भेदभाव न करता शेतकऱ्यांना सरसकट पिक विमा देण्यात यावा.अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी कृषीमंत्री धनंजय मुंढे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली.

## संक्षिप्त

### परतुर मतदार संघात येत्या काळात भगवा झंझावात निर्माण करणार– ए.जे.पाटील



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतूर मतदारसंघात परतूर मंठा मतदार संघात चार ते ११ ऑक्टोंबर मध्ये मतदारसंघात भगवा झंजावत निर्माण करणार असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख ए जे पाटील बोराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना पदाधिकारी यांची आढावा बैठक शिवसेना मध्यवर्ती कार्यालय परतूर येथे आयोजित करण्यात आली होती याप्रसंगी शिवसेना पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख माधवराव मामा कदम विधानसभा समन्वयक अशोकराव आघाव शहर प्रमुख दत्ता पाटील सुरूग मंठा येथील संतोष राव वरकड डॉक्टर काकडे बालाजी राठोड डॉक्टर संतोष पवार तुळशीराम कुहीर पप्पू दायमा तुकाराम मुळे नामदेवराव धुमाळ मधुकर बाप्पा खरात मधुकर पाईकराव गणपत खोसे भुसारे ताई किशोर पवार रंगनाथ मुळे लक्ष्मीकांत कवडी तुळशीराम निकाळजे उस्मान भाई शाहीर खालापुरे आप्पासाहेब खंदारे रमेश आकात गोपाल माने दीपक काळे महेश आकात सचिन आकात संतोष टाके महेश अवचार अदींसह शेकडो शिवसेना पदाधिकारी यांची उपस्थिती होती याप्रसंगी ज्येष्ठ शिवसैनिकांचा जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला पुढे पाटील म्हणाले की आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टिकोनातून शिवसैनिकांनीआपला भाग जिवंत ठेवण्यासाठी संघटनात्मक काम वाढवलं पाहिजे आपला मतदारसंघ हा शिवसेनेचा अभेद्य बालेकिल्ला आहे हे सिद्ध करून दाखवायचे आहे परतूर मतदारसंघातील दहा गणातील बूथ प्रमुख व गणातील प्रमुख पदाधिकारी व शिवसैनिकांच्या भगवा सप्ताहाच्या झंजावतामध्ये मध्ये गावागावातील समस्या अडीअडचणी जाणून घेऊन येणाऱ्या विधानसभा निवडणुकी संदर्भात महत्त्वाची मार्गदर्शन करणार असल्याचे त्यांनी सांगितले लोकसभा निवडणुकीच्या नंतर विरोधकांच्या पायाखालची वाळू घसरली आहे बूथ प्रमुखांनी आपापल्या बूथ वरील मतदार याद्या तपासून घ्याव्यात बोगस नोंदी आढळल्यास तात्काळ आक्षेप घेऊन बीएलओ यांच्याकडे तक्रार करावी व पक्ष संघटन वाढवण्यासाठी बऱ्याच सूचना करून जागोजागी बैठकीची नियोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोकराव आघाव यांनी केले.

### राज्य सरकारने बार्टी, सारथी,आर्टी व महाज्योतीच्या धर्तीवर मार्टी ची स्थापना करावी – प्रा.अमर शेख

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**



राज्य सरकारने जसे इतर समामाजासाठी बार्टी, सारथी, आर्टी, महाज्योती या स्वतंत्र संस्था मराठा, ओबीसी, अनुसूचित जाती च्या विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी( रिसर्च ट्रेनिंग साठी) स्थापन केल्या आहेत,त्याच धर्तीवर मुस्लिम समाजाच्या मुला - मुलींनाही उच्च शिक्षण चांगल्या प्रकारे घेता यावे यासाठी मार्टी (मौलाना आझाद रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्युट) ची स्थापना करण्यात यावी व राज्यभरात मुस्लिम समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असून या समाजाचे मागासलेपण घालविण्यासाठी या समाजातील मुलांनाही उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे, बार्टी,सारथी,आर्टि, महाज्योती या संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी दूर करणे, शैक्षणिक शिष्यवृत्ती, व्यावसायिक शिक्षण, व्यावसायासाठी भागभांडवल, परदेशी शिष्यवृत्ती, कर्जमाफीसारख्या योजना या संस्थेतर्फे राबविल्या जातात याचा फायदा मुस्लिम विद्यार्थ्यांना ही व्हावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा.अमर शेख यांनी केली आहे.

तसेच यासंदर्भात मार्टीची स्थापना करण्यासाठी सरकारने स्थापन केलेल्या सच्चर कमिटी, मेहमूद रहमान समिती, रंगनाथ मिश्रा समितीने अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारच्या संस्थेची आवश्यकता असल्याचे त्यांच्या अहवालात म्हटले होते, सदरील मार्टी स्थापनेचा प्रस्ताव वित्त विभागाकडे गेल्यानंतर तो मुस्लीम समाजासाठी स्वतंत्र संस्थेची आवश्यकता नसल्याचे कारण देत व राज्याच्या तिजोरीवर आर्थिक भार पडेल म्हणून हा प्रस्ताव फेटाळला आहे, आमची राज्य सरकारला व आदरणीय मा.ना.उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री आदरणीय अजित दादा पवार साहेबांना मागणी आहे की, मार्टीच्या स्थापनेसाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी पुनर्विचार करावा व मुस्लिम समाजाला न्याय देवून त्यांची मुले शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सजग प्रयत्न करावेत, अशा आशयाचे निवेदन विभागीय आयुक्तालयामार्फत उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे पदवीधर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. अमर शेख यांनी निवेदन पाठविले आहे.

## भोकरदन शहराच्या विकासासाठी शंभर कोटी रुपये मिळवून द्या!

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

सुंदर भोकरदन स्वच्छ भोकरदन हे भोकरदन वाशीयांचे स्वप्न असून शहरातील दलित वस्तीमध्ये मुस्लिम वस्तीमध्ये आणि गरिबांच्या घरापुढे आणि गल्लयांमध्ये अस्वच्छता असून नाल्या नाहीत रोड नाहीत रस्ते नाहीत. मोठ्या नेत्यांनी आतापर्यंत नगरपरिषदेचा निधी स्वतःच्या प्लॉटिंग मध्ये रस्ते करण्यासाठी आणि स्वतःच्या गल्लीमध्ये कामे करण्यासाठी खर्च करून गरीब समाजाकडे दुर्लक्ष केलेले आहे. ती उणीव भरून काढण्यासाठी फक्त गरीब लोकांच्या वस्तीमध्ये कामे करण्यासाठी आम आदमी पार्टीने जिल्ह्याचे खासदार कल्याण काळे साहेबांच्या कडे १०० कोटी रुपयांची मागणी केली असून तसा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी डऊव् तथा प्रशासक नगरपरिषद भोकरदन यांनी तयार करून मा.डॉ. कल्याण रावजी काळे साहेबांकडे तसेच शासनाकडे पाठवावा अशी मागणी करण्यात आलेली आहे.तशा प्रकारचे पत्र माननीय खासदार डॉक्टर कल्याणरावजी काळे साहेब तसेच डऊव् भोकरदन यांना देण्यात आलेले आहे पत्रामध्ये पुढे म्हटले आहे कीभोकरदन नगरपरिषद सध्या प्रशासकाच्या ताब्यात आहे.त्यामुळे शासनाकडून येणारा निधी नगरपरिषदेला प्राप्त झालेला नाही. त्यामुळे दलित वस्ती मुस्लिम वस्ती व इतर गरीब समाजाच्या वार्डामध्ये कोणतेही विकास कामे झालेले नाहीत. सर्व विकास कामे बंद आहेत. अनेक ठिकाणी नाल्या टाकाव्या लागणार आहेत. अनेक ठिकाणी रोडची कामे करावे लागणार आहेत.पाण्यासाठीच्या



पाईपलाईन नादुरुस्त आहेत. अंडरग्राउंड पाण्याच्या नाल्या काढण्यासाठी आणि इतर विकास कामे करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. उदाहरणा दाखल एकट्या रफिक कॉलनी नावाच्या वार्डामध्ये पाच कोटी रुपये विकास कामासाठी लागणार आहेत. त्यामुळे आपणास नम्र निवेदन देण्यात येते की शासनाकडून १०० कोटी रुपये भोकरदन नगर परिषदेसाठी मंजूर करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी ही विनंती. निवेदनाची एक प्रतमाननीय उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक नगर परिषद भोकरदन यांना विकास कामाचा आराखडा तयार करून शासनाकडे व माननीय खासदार साहेबांना सादर करण्यासाठी देण्यात आलेली आहे. यावेळी शहराध्यक्ष महजाद इस्लाम खानआम आदमी पार्टी भोकरदन घत्रछ अक्का भोकरदन जनार्दन सोळुंके बोरसे गुरुजी लिलाबाई टेकाळे फारुख भाई फिरोज भाई अनिल पगारे धनराज भारती बाबर शहा बाबर शेख जुनेद जाहिद शेख शब्बीर शेख महिला कार्यकर्ता विकास हिवाळे इमरान पत्रकार करीम लाला कादरी, सद्दाम मिर्झा, मोईद्दीन शहा, फिरोज शहा, अझम शहा, सरफराज शहा नकीब शहा,रशीद शहा, आबरार शहा, शाहरुख शहा यांच्यासह नागरीक हजर होते.

## स्वामी विवेकानंद नागरी पतसंस्थेला सहकार क्षेत्रातील मानाचा दीपस्तंभ पुरस्कार प्रदान

### मराठवाडा स्तरावरील प्रथम पुरस्कार मिळणे गौरवास्पद बाब–अभय कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनच्यावतीने दिला जाणारा सहकार क्षेत्रातील मानाचा दीपस्तंभ पुरस्कार जालना येथील स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेला प्रदान करण्यात आला. मराठवाडा स्तरावरील पहिला पुरस्कार पटकावण्याचा मान या पतसंस्थेने मिळविला आहे.



हैदराबाद येथील रामोजी फिल्म सिटी येथे आयोजित कार्यक्रमात कॉसमॉस बँकेचे चेअरमन मिलिंद काळे, गोदावरी मल्टीस्टेट पतसंस्थेचे अध्यक्ष राजश्री पाटील आणि महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभय कुलकर्णी आणि सचिव प्रसन्ना जाफराबादकर यांनी दीपस्तंभ पुरस्कार स्वीकारला. सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मराठवाडा विभागातील ५० ते १०० कोटी आर्थिक उलाढाल या गटात स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेला हा मानाचा दीपस्तंभ पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र राज्यातील पतसंस्था चळवळीत दीपस्तंभप्रमाणे दिशादर्शक कार्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याचे गौरवोद्गार पतसंस्था फेडरेशनचे राज्याध्यक्ष काकासाहेब कोयटे यांनी काढले.

या पुरस्काराबद्दल प्रतिक्रिया देताना पतसंस्थेचे अध्यक्ष अभय कुलकर्णी म्हणाले की, सहकार चळवळीच्या विकासात ज्या सहकारी संस्थांनी आतापर्यंत महत्वाचे योगदान दिले आहे व देत आहे, त्यांना प्रोत्साहन म्हणून दिला जाणारा मराठवाडा स्तरावरील पहिला पुरस्कार स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेला मिळणे ही निश्चितच गौरवास्पद बाब असून, भविष्यात अधिक चांगले काम करण्यास हा पुरस्कार संचालक मंडळाला प्रेरीत व प्रोत्साहित करणारा ठरेल, असे सांगून इतर सहकारी संस्था उत्कृष्ट काम करणाऱ्या सहकारी संस्थांचे अनुकरण करण्यासाठी प्रोत्साहीत होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला..

## संघटन मजबुतीसाठी प्रत्येक माणूस जोडा -राधाजी शेळके

### लहुजी साळवे बहुजन क्रांती सेना शाखांची स्थापना

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

अन्यायग्रस्तांना न्याय, उपेक्षित,वंचितांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी निस्वार्थी,निर्मळ भावनेने सामाजिक कार्यात अग्रेसर असलेली लहुजी साळवे बहुजन क्रांती सेना ही पक्षविरहित संघटना असून संघटन मजबूत करण्यासाठी सर्व जाती -धर्मातील सामाजिक कार्याची आवड असलेल्या प्रत्येक माणसाला जोडा. असे आवाहन संघटनेचे संस्थापक राधाजी शेळके यांनी केले.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून परतुर तालुक्यातील हनुवाडी, लिंगसा, वलखेड, सेलगांव आदी ठिकाणी लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या शाखांची स्थापना करण्यात आली. यावेळी युवा नेते शिवबा शेळके, महाराष्ट्र उपाध्यक्ष गणपत कांबळे, प्रदेश सरचिटणीस बन्सीलाल भंडारी, मराठवाडा कार्याध्यक्ष अंकुश कांबळे, उपाध्यक्ष नारायण



दाभाडे,सचिव बाबासाहेब पाटोळे, जिल्हाध्यक्ष सर्जेराव पाटोळे ,महिला आघाडी च्या कासाबाई शिरगुळे, जिल्हा सरचिटणीस दिलीपराव उकांडे सल्लागार मारुती चौरे ,परतुर तालुकाध्यक्ष लक्ष्मणराव खनपटे यांची प्रमुख उपस्थिती होती. राधाजी शेळके पुढे म्हणाले, संत महामानवांचे चरित्र, कार्य व त्यांच्या विचारधारेवर संघटना कार्यरत आहे. असे नमूद करत व्यसनांच्या आहारी गेलेल्यांना वेसन घालून संघटनेची वेगळी ओळख संपूर्ण भारतभर निर्माण करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. कुठल्याच पक्षाच्या दा- वणीला संघटना बांधणार नसल्याचेही राधाजी शेळके यांनी स्पष्ट केले. प्रास्ताविकात महाराष्ट्र उपाध्यक्ष गणपत कांबळे यांनी जालना जिल्ह्यात संघटनेमार्फत अन्याय, अत्याचाराच्या विरोधात उठवलेले आवाज ,स्वतंत्र आरक्षण,गायरान धारक यांच्या साठी केलेल्या संघर्ष, उप- ोषण,आंदोलने केली असून आर्टी ची स्थापना करण्यात आली तर जालना जिल्ह्यात ०१ ऑगस्ट ला ड्राय डे घोषीत करण्यात आला हे आंदोलनाचे यश असल्याचे गणपत कांबळे यांनी सांगितले. युवा नेते शिवबा शेळके यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. या वेळी तालुका उपाध्यक्ष सुरेश उकांडे, सर्कल प्रमुख भगवान थोरात, सोमनाथ आदमाने, शरदराव शेळके, गोविंद शेळके, संजय दळवी, केशव थोरात, धोंडीबा थोरात, गवारे यांच्यासह यांच्यासह पदाधिकारी, लहु सैनिक, महिला, पंचक्रोशीतील ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## जोडे मारो अंदोलन व ठाकरे तसेच राणे यांच्या पुतळ्याचे सकल मराठा समाजाकडून दहन

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याबद्दल तसेच आरक्षणाबाबत आक्षेपहार्य वक्तव्य केल्याबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे व खा.नारायण राणे यांचा मंठा तालुक्यातील केंधळी येथे सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने निषेध व्यक्त करून जोडे मारो आंदोलन करत प्रतिमेचे दहन करण्यात आले. याप्रसंगी सकल मराठा समाज बांधवांनी एक मराठा लाख मराठा नारायण राणे कोंबडीचोर अशा आशयाचे फलक हातात घेऊन विविध घोषणा दिल्या. यावेळी पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महामार्ग जोडणाऱ्या जालना-नांदेड द्रुतगती महामार्गातील बाधित शेतकऱ्यांना तात्काळ योग्य मोबदला द्या

### शिवसेना नेते माजी मंत्री अर्जुन खोतकर यांची जालना जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महामार्ग जोडणाऱ्या जालना - नांदेड द्रुतगती महामार्गातील बाधित शेतकऱ्यांना तात्काळ योग्य मोबदला द्यावा अशी मागणी शिवसेना नेते माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनी केलीय. अर्जुन खोतकर यांनी आज शेकडो बाधित शेतकऱ्यांसह जालना जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी जालना - नांदेड द्रुतगती



महामार्गातील बाधित शेतकऱ्यांना तात्काळ योग्य मोबदला द्यावा अशी मागणी त्यांच्याकडे निवेदनाद्वारे केलीय. जालना- नांदेड समृध्दी महामार्गासाठी संपादीत होणाऱ्या जमीनीची संयुक्त मोजणी करुन चावडी वाचन व परिशिष्ट १६ प्रशासनाकडुन प्रसिध्द कलेले आहे. या महामार्गासाठी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी, विहीरी, शेततळे, पाईपलाईन, गोठे, झाडे,



घरे, बोअरवेल इत्यादी संपादीत होणार आहेत. यासंदर्भात जिल्हा प्रशासनाकडुन कायदेशीर प्रक्रिया सुरु असुन बाधित शेतकऱ्यांना त्यांच्या संपादीत जमीन व इतर गोष्टींचा मोबदला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागपुर-मुंबई समृध्दी महामार्गाप्रमाणेच तात्काळ मिळावा अशी प्रकल्पग्रस्तांची मागणी आहे. शासनाचा पथदर्शी प्रकल्प म्हणून समृद्धी नागपूर- मुंबई हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महामार्गास ओळखले जाते. सदर महामार्गास जोडणारा जालना - नांदेड समृद्धी द्रुतगती महामार्गातील बाधित शेतकरी जमीन मालकास अत्यंत तुटपुंजा मोबदला शासनाकडील महसूल विभागाकडून मिळत आहे. दरम्यान याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष देऊन जालना - नांदेड द्रुतगती महामार्गातील शेतकऱ्यांना तत्काळ योग्य मोबदला द्यावा अशी मागणी अर्जुन खोतकर यांनी केलीय.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### डॉ.मुक्ता सराप यांना पीएचडी पदवी

**परभणी,/प्रतिनिधी:** येथील डॉ. मुक्ता ऋषिकेश सराफ यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे ५ ऑगस्ट २०२४ रोजी पीएच. डी. पदवी घोषित करण्यात आली.

डॉ. मुक्ता सराफ यांनी जर्मन अभ्यासक 'अल्फ्रेड हिलेब्रांट यांचे संस्कृत वाङ्मयाला योगदान' या विषयावर शैक्षणिक क्षेत्रातील पीएच.डी. या उच्च पदवीसाठी विद्यापीठाला आपला शोध प्रबंध सादर केला होता. त्याासाठी ज्येष्ठ संस्कृत विद्वान डॉ. गणेश थिटे व विद्यापीठातील संस्कृत प्राकृत विभाग प्रमुख डॉ. देवनाथ त्रिपाठी यांनी मार्गदर्शन केले होते. परभणी शहरातील प्रतिष्ठित नागरिक रमेशराव सराफ व सौ. कविता सराफ यांच्या त्याा सुनबाई आहेत. या कार्यात पती ऋषिकेश यांची मुक्ता यांना मोठी साथ लाभली. दरम्यान, या यशाबद्दल त्याांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### ४२ रुग्णांची होणार मोफत मोतिबिंदु शस्त्रक्रिया

**परभणी,/प्रतिनिधी :** आमदार डॉ. राहुल पाटील यांच्या पुढाकारातून आयोजित केलेल्या मोतिबिंदु तपासणी शिबीरातून हजारो रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्याातील ४२ रुग्णांवर मोफत मोतिबिंदु शस्त्राक्रिया करण्यात येणार आहे.

शिवसेना अल्पसंख्याक विभागाच्या महिला जिल्हा संघटक अ‍ॅड. नहिद यांच्या प्रयतातून येथील गवसिया कॉलनीत मोफत मोतिबिंदु तपासणी शिबीर आणि चष्मे वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार डॉ. राहुल पाटील, डॉ. विवेक नावंदर हे उपस्थित होते. या शिबीरातून हजारो रुग्णाची तपासणी करण्यात आली. त्याातून ४२ रुग्णांवर मोतिबिंदुची शस्त्राक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच ४०० वर गरजू रुग्णांना चष्मेसुध्दा वितरित करण्यात आले. यावेळी शिवसेनेच्या अल्पसंख्यांक सेनेचे जिल्हा प्रमुख करामत पठाण, प्रभाग प्रमुख इरफान खान, रहमान भाई, कासीम पिंजारी, शहर प्रमुख मोहम्मद अब्दुला राज आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत केले.

### गंगाखेडात बांधकाम कामगारांना वस्तू संचाचे वाटप

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम विभागाच्या वतीने बांधकाम कामगारांना देण्यात येणाऱ्या गृहोपयोगी वस्तू संचाचे वाटप आमदार डॉ. रताकर गुट्टे यांच्याहस्ते करण्यात आले.

बांधकाम कामगारांच्या मेहनतीचे चीज व्हावे. तसेच त्याांच्या दैनंदिन जीवनात काही वस्तूंची मदत मिळावी, या हेतूने शासनाच्या वतीने प्रत्योक कामगारांना या गृहोपयोगी साहित्यााचे वाटप करण्यात येते. या वस्तू संचाचे वाटप करण्याकरीता शहरातील स्व. गोपीनाथ मुंडे सभागृहात छोटेखानी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार डॉ. रताकर गुट्टे यांच्याहस्ते या कामगारांना हे साहित्या वाटप करण्यात आले. यावेळी यावेळी मित्र मंडळाचे जिल्हाध्यक्ष प्रल्हादराव मुरकुटे, रासप जिल्हाध्यक्ष अ‍ॅड.संदीप आळनुरे, प्रभारी हनुमंत मुंडे, पालम तालुका प्रभारी माधवराव गायकवाड, तालुकाध्यक्ष रामप्रसाद सातपुते, राधाकृष्ण शिंदे, शहराध्यक्ष टॅड.अकबर सय्यद, माजी नगरसेवक सत्यापाल साळवे, राजू खान, उद्धव शिंदे, माणिकराव आळसे, नागनाथ कासले, वैजनाथ टोले, पिराजी कांबळे, उद्धव शिंदे, चांद भाई, सतिश घोबाळे, संजय पारवे, इंतेसार सिद्दिकी राजेभाऊ (बापू) सातपुते, खालेद शेख लाभार्थी कामगार बंधू आणि भगिनी तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ऑनलाईन गेमिंग सुधारणा करण्याची मागणी- खा.खान

**परभणी,/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार फौजिया खान यांनी राज्यसभेत ऑनलाईन गेमिंगमुळे लहान मुलांच्या मनावर होणाऱ्या परिणामांविषयी चिंता व्यक्त केली. खान यांनी , कॉल ऑफ ड्यूटी, ग्रँड थेफ्ट ऑटो (), आणि द ब्लू व्हेल सारख्या गेम्सचा उल्लेख करताना, हे गेम्स मुलांना हिंसक वर्तनासाठी प्रवृत्त करत असल्याचे सांगितले. खासदार फौजिया खान यांनी निदर्शनास आणून दिले की, अशा गेम्सवर भारतात बंदी असतानाही हे सहज उपलब्ध होत आहेत. खान यांनी २४ जुलै रोजी घडलेल्या एका दुःखद घटनेचा हवाला देऊन अशा गेम्सवर तत्काळ बंदी घालण्याची मागणी केली. खासदार खान यांनी म्हटले की, भारतात सध्या या विषयावर विशिष्ट कायद्यांचा अभाव असल्यामुळे अशा घटनांची पुनरावृत्ती होत आहे.

सोलापूर तरुण भारत
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी–विक्री–प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# लाडकी बहिण योजनेत जिल्हयात जिंतूर तालुका अव्वल

## अ‍ॅड.सुनिल बुधवंत यांनी घेतला आढावा, लाभार्थी महिलांचा उत्तम प्रतिसाद

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर शिवसेना तालुकाप्रमुख अ‍ॅड. सुनिल बुधवंत यांनी दि.३१ जुलै २०२४ रोजी जिंतूर तहसीलदार श्री. राजेश सरवदे यांची भेट घेतली व जुलै महिना अखेर पर्यंत लाडकी बहीण योजनेसाठी आलेल्या प्रस्तावांची व अंमलबजावणीची माहिती घेतली.

महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेस तालुक्यातून भरभरून प्रतिसाद मिळत असून तालुक्यातील महिलांची संबंधित कार्यालयात गर्दी होत आहे. जुलै महिन्यापासूनचे पैसे महिलांच्या खात्याात जमा करण्यात येणार असून दर महिन्याला १५००/- रुपये राज्य शासन देणार आहे. या योजनेसाठी जिंतूर तालुक्यातून ४५ हजाराहून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत, हा आकडा जिल्ह्यातील इतर तालुक्यांपेक्षा जास्तच असल्यामुळे लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरून घेण्यात जिंतूर तालुका हा परभणी जिल्ह्यात अव्वल ठरला आहे.




तहसीलदारांची भेट झाल्यानंतर पत्रकारांना संबोधन करताना अ‍ॅड. सुनिल बुधवंत यांनी लाडक्या बहिणींनी या योजनेसाठी निधी वगैरे नसल्याच्या अपप्रचाराला व गैरसमजाला बळी पडू नये असे आवाहन केले. लाडकी बहीण योजनेचे पैसे पात्र महिलांच्या खात्याात लवकरच जमा होणार असून सध्या या प्रक्रियेने वेग घेतला आहे. आता निवडक महिलांच्या खात्याात प्रायोगिक तत्त्वावर एक रुपया जमा केला जात असून हा तांत्रिक प्रक्रियेचा तथा पडताळणीचा भाग आहे. लवकरच पात्र महिलांच्या खात्याात सन्मान निधी जमा होणार असल्यामुळे ज्या बहिणींचे अर्ज भरण्याचे राहिले असतील त्याांनी लवकरात लवकर अर्ज भरून घ्यावे, अर्ज भरण्यासाठी ऑगस्ट अखेर पर्यंतची मुदत आहे अशी माहिती दिली.

तसेच या योजनेसाठी जिंतूर तालुक्यातील प्रशासनाने घेतलेल्या मेहनतीची माहिती तथा अहवाल शिवसेना जिल्हाप्रमुख व्यंकटराव शिंदे यांच्या समवेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन त्यांना सादर करणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी अशोक देशमुख, श्री. सोपान पालवे, रविशंकर पालवे, संतोष घुगे, मुंजाजी पालवे, श्री. किशन घुगे, सुखदेव पालवे यांची उपस्थिती होती. या योजनेसाठी जिंतूर तालुक्यात सर्वांचे प्रयत्न करावेत असेही आवाहन केले आहे.

# जिंतूर, सेलू अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना हप्त्याचे वितरण करावे- माजी आ.भांबळे

**जिंतूर,/प्रतिनिधी:-** जिंतूर नगर परिषद जिंतूर व नगर परिषद सेलू यांच्यावतीने शहरातील विविध घरकुल लाभार्थ्यांना गेल्या काही महिन्यापासून कुठलाच हप्ता न मिळाल्यामुळे तो हप्ता तात्काळ देण्यात यावा अशी मागणी माजी आ.विजय भांबळे यांनी निवेदनाव्दारे केली आहे.




नगर परिषद जिंतूर व नगर परिषद सेलू अंतर्गत जिंतूर व सेलू शहरातील प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, यशवंतराव चव्हाण आवास योजना, शबरी आवास योजना व इतर घरकुल योजनेतील मंजूर लाभार्थ्यांचे बऱ्याच दिवसापासून हप्ते प्रलंबित असल्यामुळे अनेक घरकुल लाभार्थी अडचणीत आले आहेत. अनेक लाभार्थी यांचे घरकुल चे काम पूर्ण झाले असून आज पर्यंत सदर लाभार्थ्यांना घरकुल हप्त्याचे वितरण झाले नाही, त्याामुळे ते आर्थिक अडचणीत सापडले आहेत तसेच अनेक लाभार्थी यांनी स्वतःचे घर पाडून नवीन बांधकाम चालू केल्यामुळे त्याांना राहण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याासाठी सर्व घरकुल योजनेतील तिसरा चौथा व पाचवा हप्ता तात्काळ वितरित करण्यासाठी आपल्या स्तरावरून योग्य ती कार्यवाही करावी, असे निवेदन विजयराव भांबळे यांनी जिल्हाधिकारी साहेबाकडे दिले. या निवेदनावर विजय भांबळे, साबिया बेगम काफिलूर रहेमान ( मा. नगराध्यक्ष न.प. जिंतूर), बाळासाहेब भांबळे, शेख मोहम्मद, साहेद मिर्झा, शौकत पठाण, अय्युम कादरी, दत्तराव काळे,मनोहर डोईफोडे, दलवीर पठाण, शेख शोहेब, राहुल सागरे हकीम पठाण आदींच्या स्वाक्षरी आहेत.



## एल.के.आर.रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कुलमध्ये विद्यार्थ्यांसाठी गेस्ट लेक्चर सिरीज

**सेलू,/प्रतिनिधी :** श्रीराम प्रतिष्ठान संचलित एल. के. आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश सिबीएसई स्कूल सेलू येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांच्या संकल्पनेतून वर्ग नववी -दहावी च्या विद्यार्थ्यांसाठी सर्व विषयाच्या गेस्ट लेक्चर चे आयोजन करण्यात येते.शाळेतील विद्यार्थ्यांना अतिरिक्त ज्ञान मिळावे यां संकल्पनेतून गेस्ट लेक्चर चे आयोजन डॉ. संजय रोडगे करत असतात.

आज दि ५. ऑगस्ट सोमवार रोजी डॉ सुधाकर चिताडे भौतिक शास्त्रा विभागप्रमुख निवृत्त ज्ञानोपासक महाविद्यालय परभणी यांच्या गेस्ट लेक्चर चे विद्यार्थ्यांसाठी आयोजन करण्यात आले होते.

या गेस्ट लेक्चर सिरीज मध्ये आज भौतिकशास्त्रा विषयाचे डॉ. सुधाकर चिताडे सरांनी मॅग्नेटिक इफेक्ट ऑफ इलेक्ट्रिसिटी यां विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विज्ञान हा विषय थोडा अवघडच ! त्याा जर भौतिकशास्त्रा अभ्यासायचं म्हणजे किचकट होऊन जातं. हाच भौतिकशास्त्रा विषय अगदी सोप्या भाषेत सरांनी विद्यार्थ्यांसमोर मांडला.सोबत स्पर्धा परीक्षेत भौतिकशास्त्रा विषयाचे महत्त्व सांगितले तसेच विद्यार्थ्यांच्या अडचणीचे शंका समाधान केले. याप्रसंगी डॉ. संजय रोडगे यांनी डॉ. सुधाकर चिताडे यांचा सन्मान केला. सोबत डॉ सविता रोडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा महादेव साबळे,शाळेचे प्रिन्सिपल कार्तिक रताला, प्रगती क्षीरसागर हे उपस्थित होते.

## संभाजी नगर येथील आक्रोश मोर्चात परभणी जिल्हयातील पाच हजार कार्यकर्ते व दिव्यांग बांधव जाणार - शिवलिंग बोधने

**परभणी,/प्रतिनिधी :** प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक, अध्यक्ष तथा दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष आ. बच्चुभाऊ कडू, मंत्री दर्जा यांच्या नेतृत्वाखाली क्रांतीदिनी म्हणजेच ९ ऑगष्ट २०२४ रोजी दिव्यांग, शेतकरी, शेतमजूर, निराधार, कामगारांच्या प्रमुख मागण्यासाठी संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयावर दि.०९ ऑगष्ट २०२४ रोजी सकाळी ११:०० वा. मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चात राज्यभरातून ५ लाख लोक सहभागी होतील असा अंदाज आहे.

परभणी जिल्ह्यात या मोर्चाच्या तयारीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदधिकाऱ्यानी गावपातळीवर बैठका घेऊन मा. आ. बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वात संभाजीनगर येथे होणाऱ्या जन आक्रोश मोर्चात जन सामान्याच्या प्रश्नावर न्याय मागीतला जाणार असून दिव्यांग बांधव, शेतकरी, शेतमजूर, निराधार, कामगार यांच्या घरकुलाचा प्रश्न असेल, पगारीचा पश्न असेल, शेत मालाला भाव असेल, दिव्यांगासाठी आरक्षण असेल याशिवाय ग्रामपंचायत कर्मचारी व रोजगार सेवकांच्या विविध मागण्यासाठी होणाऱ्या या मोर्चामध्ये सहभागी होण्यासाठी जनजागृती केली.

यात जिल्हा प्रमुख शिवलिंग बोधने, उप जिल्हाप्रमुख रामेश्वर जाधव, पुर्णा तालुका प्रमुख शिवहार सोनटक्के, शहर प्रमुख संजय वाघमारे, सोनपेठ तालुका प्रमुख अशोक मस्के, शहर प्रमुख मकसुद पठाण, मानवत तालुका प्रमुख माणिक राठोड, पाथरी तालुका प्रमुख दिपक खुडे, गंगाखेड तालुका प्रमुख जाधव, उध्दव गरुड, श्याम भोंग, अंकुश गिरी अदीनी गावपातळीवर बैठका घेतल्या आहे. या अक्रोश मोर्चा मध्ये सहभागी होण्यासाठी परभणी जिल्हातून २०० चार चाकी वाहनाची व्यवस्था करण्यात आली असून त्याशिवाय रेल्वेने पण दिव्यांग बांधव व प्रहार कार्यकर्ते या मोर्चात सहभागी होण्यासाठी जाणार असल्याची माहिती प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा प्रमुख शिवलिंग बोधने यांनी दिली आहे.

### बहिरेपणा तपासणी व कर्णरोपण यंत्र वाटप शिबीरास प्रतिसाद

**परभणी,/प्रतिनिधी :** राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रमअंतर्गत शून्य ते १८ वर्ष वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. या तपासणीमध्ये संशयित जन्मजात बहिरेपणा असलेल्या बालकांची यशश्री ईएनटी हॉस्पिटल मिरज, सांगली यांच्यामार्फत बुधवार (दि.७) रोजी जिल्हा स्त्री रुग्णालय, परभणी येथील डी. ई.आय.सी विभाग येथे १८ वर्षाखालील बहिरेपणा असलेल्या बालकांची मोफत तपासणी व उपचाराबाबत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या तपासणी शिबिरामध्ये आवश्यक असलेल्या बालकांची शस्त्राक्रिया व उपचार तसेच कानाची मशीन मोफत देण्यात आली. तरी या शिबीरात गरजू बालक, विद्यार्थी व पालकांनी आपला सहभाग मोठया प्रमाणात घेतला त्यामुळे जिल्हा शल्य चिकित्सक, अति. जिल्हा शल्य चिकित्सक व निवासी वैद्यकीय अधिकारी यांनी आभार मानले.

## श्रावण महिन्याच्या पहिल्याच सोमवारी शिवालये गजबजली

**जिंतूर,/प्रतिनिधी-** पहिल्या श्रावणी सोमवारी (ता.०५) पहाटेपासून शंभू महादेवाच्या दर्शनासाठी शहरासह परिसरातील शिवालये शिवभक्तांनी गजबजली होती. यानिमित्त ठिकठिकाणी रुद्राभिषेक, शिवलीलामृत पारायणादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.



श्रावण महिन्याला हिंदू धर्मात धार्मिक महत्त्व आहे. हा महिना अतिशय पवित्र मानला जात असून, तो शंकराला समर्पित आहे. श्रावणातील प्रत्योक दिवसाचे वेगवेगळे महत्त्व आहे. यातील सर्वांत महत्त्वाचे व्रत श्रावणी सोमवार शिवपूजनासाठी पवित्र आणि शुभ मानला जातो. यानिमित्त श्रावणातील पहिल्या सोमवारी शहरातील श्री. सिद्धेश्वर, अमृतेश्वर मठ, चिंतामणी, आनंदेश्वर, मळ्यातील सोमेश्वर, नगरेश्वर मंदिरात भल्या पहाटेपासून अबालवृध्द शिवभक्तांच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्याा. यात महिला भाविकांची संख्या अधिक होती. तसेच पाचलेगाव येथील श्री. मुक्तेश्वर आश्रम, परभणी रोडवरील श्री. मैनापुरी देवस्थान, माणकेश्वर शिवारातील महादेव मंदिरातही पंचक्रोशीतील भाविकांनी महादेवाच्या पिंडीचे भक्तीभावाने दर्शन घेतले.

शहरातील सिद्धेश्वर मंदिर येथून शिवभक्तांची मैनापुरी संस्थान येथे पायी दिंडी गेली होती. पांगरी, माथला, पुंगळा येथूनही परंपरेने पायी दिंड्या आल्या होत्याा. मंदिराच्या आवारात बेलफूल व प्रसादाची दुकाने थाटली असल्याने परिसराला एकदिवसीय जत्राचे स्वरूप आले होते. पुंगळा येथील भाविक भक्तांच्या वतीने दर सोमवारी महाप्रसादाचे आयोजन केले जात आहे.

# महसुल पंधरवाडा अंतर्गत परभणी जिल्हाधिकारी कार्यालयात स्वच्छता

**परभणी,/प्रतिनिधी :** महसूल पंधरवाडा २०२४ अंतर्गत आज सोमवारी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय' हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती अनुराधा ढालकरी, उपविभागीय अधिकारी श्रीमती संतोषी देवकुळे आणि नायब तहसीलदार प्रशांत वाकोडकर यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकारी कर्मचाऱ्यांनी सहभागी होत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबविली.



महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा आणि विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना याबाबत जिल्ह्यातील नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ घेता यावा. त्याासाठी शासनाच्या निर्देशानुसार महसूल पंधरवाड्यात आज हा उपक्रम राबविण्यात आला. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे आणि उपस्थित अधिकाऱ्यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात वृक्षारोपणही करण्यात आले. महसूल पंधरवाड्यात राबविण्यात येणारे विविध उपक्रम आज सोमवारी (दि.५) कृषि मार्गदर्शन कार्यक्रम, ६ ऑगस्टला शेती, पाऊस आणि दाखले, ७ ऑगस्टला युवा संवाद, ८ ऑगस्टला महसूल-जन संवाद, ९ ऑगस्टला महसूल ई-प्रणाली, १० ऑगस्टला सैनिक हो तुमच्यासाठी, ११ ऑगस्टला आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन, १२ ऑगस्टला एक हात मदतीचा, दिव्यांगाच्या कल्याणाचा, १३ ऑगस्टला महसूल अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण, १४ ऑगस्टला महसूल पंधरवाडा वार्तालाप तर १५ ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील कार्यरत सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी कर्मचारी पुरस्कार वितरण व महसूल पंधरवाडा सांगता समारंभाचा कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी कळविले आहे.

### जिल्हयात दोन महिन्यात सरासरी ४३५ मिमी पावसाची नोंद

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी १३.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून, सेलू तालुक्यात सर्वाधिक २२.३ मि.मी. पाऊस पडला आहे. तर परभणी जिल्हयात जुन व जुलै व ऑगस्टच्या दि.७ तारखेपर्यंत एकूण ४३५ मिमी पावसाची नोंद झाली असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. जिल्ह्यात आज सकाळपर्यंत नोंदला गेलेला तालुकानिहाय सरासरी पाऊस पुढीलप्रमाणे असून कंसातील आकडेवारी १ जूनपासून आजपर्यंत झालेल्या पावसाची आहे. परभणी ८.७ (३९१), गंगाखेड १४.५ (५४६.२), पाथरी ८.१ (३६८.२), जिंतूर १९.३ (४६७.९), पुर्णा ८.३ (४१४.७), पालम १७.९ (५१४.४), सेलू २२.३ (४०३.७) सोनपेठ १०.५ (४२४) आणि मानवत तालुक्यात ७.२ (४०२.१) पाऊस पडला आहे.

### भारत सरकार शिष्यवृत्ती शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेसाठी अर्ज नोंदणी करण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी :** शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४ मधील प्रवेशित व भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेसाठी पात्र अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन अर्ज करणेसाठी महाडिबीटी प्रणाली दि. २५ जुलैपासून सुरु झाली असुन ऑनलाईन प्रणालीवर अर्ज नोंदणी व अर्जाची पडताळणी करुन समाज कल्याण कार्यालयाच्या लॉगिनवर पाठविण्याबाबत संबंधित विद्यार्थी व महाविद्यालयांनी कार्यवाही करण्याबाबत सूचना सर्व महाविद्यालय यांना दिलेल्या आहेत.

शासन निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार संबंधित महाविद्यालयांत राबविण्यात येणारे अभ्यासक्रमाची शिक्षण शुल्काची मंजुरी, विद्यापिठांमार्फत दिल्या जाणारी इतर शुल्काची मंजुरी व शैक्षणिक विभाग/ शासकीय यंत्रणा यांचेकडुन घेण्यात येणारी मंजुरी या सर्व बाबीची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य व संबंधित लिपिक कर्मचारी यांची असल्याने सदरील कामकाजास प्राधान्य देण्यात यावे. महाविद्यालयांत प्रवेशित व शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात कॅम्प घेऊन सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटी न राहता नोंदणी होतील याची दक्षता घेण्यात यावी. महाविदयालयात स्थापन करण्यात आलेल्या समितीमधील सदस्यांची मदत घेण्यात येऊन सोशल मिडीयाच्या माध्यमातुन सर्व विद्यार्थ्यांशी संपर्क करावा व अर्ज नोंदणी होतील याची दक्षता घेण्यात यावी.